॥ सत्यमेव जयते ॥

महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी

(वन हक्क मान्यता)

अधिनियम २००६ व नियम २००८ मधील

# सामुहिक वन हक्क

तरतुदींच्या अंमलबजावणी करीता

# मार्गदर्शिका





सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

# शुभसंदेश

गडचिरोली जिल्हा हा आदिवासी बहुल व वनाने व्यापलेला असल्याने अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८ या कायद्याचे या जिल्ह्यातील जनतेसाठी अनन्य साधारण महत्व आहे. वनहक्क कायद्याच्या प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे ज्यांची उपजिवीका वनावर अवलंबून आहे अशा समाजाला त्याच्या वापराचे व व्यवस्थापनाचे हक्क दिल्याने लोक व पर्यावरण या दोहोंच्या शाश्वत विकासाची खात्री होते. हे लक्षात घेऊन गडचिरोली जिल्हा महसुल प्रशासनाने जिल्हापरिषद, वनविभाग, आदिवासी विकास विभाग, ग्रामसभा आणि स्वयंसेवी संस्था यांच्या सोबत सामुहीक/वैयक्तीक वनहक्काच्या बाबतीत राज्यात तसेच देशातही पथदर्शक असे काम केले आहे. ही प्रक्रिया राज्यातील इतर जिल्ह्यांनाही मार्गदर्शक ठरावी. पुढील काळात पर्यावरण आणि वननिवासींच्या शाश्वत उपजिवीका या दोन्हीच्या अनुषंगाने सामुहीक वनहक्काच्या अंमलबजावणीची कालबध्द प्रक्रिया आपल्या जिल्ह्यामध्ये कशी सुरु करता येईल याचा विचार लोकप्रतिनिधी, महसुल, वन व आदिवासी विभागातील अधिकारी यांनी करावा असे माझे सर्वांना कळकळीचे आवाहन आहे.

वनहक्क अधिनियमाअंतर्गत महाराष्ट्रातील तथा भारतातील वननिवासी यांना सामाजिक व आर्थिक न्यायाच्या प्रस्थापनेच्या दृष्टीने महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या सामुहीक वनहक्काची अंमलबजावणी प्रभावीरित्या होण्यासाठी गडचिरोली जिल्ह्यात ही मार्गदर्शिका अत्यंत उपयुक्त ठरली आहे. सर्व स्तरावर वनहक्क कायद्याच्या अधिक अभ्यासाची गरज असून त्या दृष्टीने या मार्गदर्शिकेचा तयार संदर्भ म्हणून उपयोग व्हावा ही अपेक्षा. महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये गडचिरोली जिल्ह्यात ज्या ग्रामसभांनी गौणवनोपजाच्या व्यवस्थापनातून वनाधारित विकासाची वाटचाल सुरु केली आहे, ती भविष्यात वनाधारित शाश्वत विकासाच्या धोरणांना दिशा देणारी आहे.

गडचिरोली जिल्ह्याने कठीण परिस्थितीत अनेक समस्यांवर मात करुन वनहक्क कायद्याची अंमलबजावणी यशस्वीरित्या करुन राज्याला अभिमान वाटावे असे भरीव काम केले आहे. मला हे नमुद करतांना मन:स्वी आनंद होत आहे की, वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीत गडचिरोली जिल्हा प्रशासनाने राज्यात तसेच देशात प्रथम क्रमांकाचा मान मिळविलेला आहे. या मार्गदर्शिकेच्या निर्मितीत सहभागी असणारे जिल्हा महसुल प्रशासन आणि सामाजिक कार्यकर्त्यांचे मन:पुर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा !

आर. आर. पाटील
गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा
पालकमंत्री, गडचिरोली जिल्हा



सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# मनोगत

जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली यांच्या वतीने ६६ वा स्वातंत्र्यदिन दिनांक १५ ऑगष्ट २०१२ रोजी मा. पालकमंत्री यांच्या शुभ हस्ते या मार्गदर्शिकेचे प्रकाशन होत आहे.

गडचिरोली जिल्हा हा राज्यातील वैशिष्टयपूर्ण असा जिल्हा आहे. येथील ७८% भूभाग वनाने व्यापलेला असून नैसर्गिक साधनसंपत्तीच्या बाबतीत समृध्द आहे. तरीही सर्वात मागास, समस्याग्रस्त जिल्हा अशी याची ओळख आहे. जिल्ह्यातील बहुसंख्य वननिवासी उपजिवीकेसाठी वनावर अवलंबून असुन नैसर्गिक संसाधनांचा परंपरागत शाश्वत वापर करत आहेत. कायद्याच्या प्रस्तावनेत उल्लेख केल्याप्रमाणे वननिवासींवरील ऐतिहासिक अन्याय दूर होण्यासाठी या कायद्याची अंमलबजावणी कार्यक्षमतेने करण्यास जिल्हा महसुल प्रशासन पारदर्शक, गतिमान आणि लोकाभिमुख झाले आहे. उर्वरीत ग्रामसभांच्या सामुहीक वनहक्काना मान्यता देण्यासाठी प्रशासनाने कालबध्द कार्यक्रम आखून कार्यवाही सुरु केली आहे.

गडचिरोली जिल्ह्यात तसेच राज्यातील सर्व महसुल अधिकारी/कर्मचारी यांना क्षेत्रीय स्तरावरील वनहक्क दाव्याची प्रक्रिया, दस्तऐवजांची हाताळणी तथा कायदेशीर तरतुदींची माहिती असणे अत्यावश्यक आहे. सदर अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी होण्याचे दृष्टीने ही मार्गदर्शिका निश्चितच उपयुक्त ठरेल याची मला खात्री आहे.

महाराष्ट्रामध्ये गडचिरोली जिल्ह्याने वनहक्क अंमलबजावणीचे पथदर्शी काम केले आहे. हे करीत असतांना जिल्हा महसूल प्रशासनाने वनहक्क अधिनियमाच्या अनुषंगाने अनेक प्रकारच्या अडीअडचणी आणि समस्यांना तोंड दिले आहे. या सर्वांवर यशस्वीरित्या मात करुन वनहक्कांना मान्यता देण्यात आलेली आहे.

या मार्गदशिकेची संकल्पना साकारण्यात अप्पर जिल्हाधिकारी, अहेरी श्री. संजय धिवरे आणि श्री. देवाजी नवलु तोफा – सदस्य, ग्रामसभा मेंढा (लेखा), श्री. मोहन हिराबाई हिरालाल – संयोजक, वृक्षमित्र, चंद्रपूर–गडचिरोली व श्री. सुबोध कुलकर्णी – समन्वयक, ज्ञानप्रबोधिनी, गडचिरोली यांचा प्रमुख सहभाग आहे.

महाराष्ट्रातील सर्व विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना वनहक्क अंमलबजावणीसाठी शुभेच्छा!

अभिषेक कृष्णा (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी, गडचिरोली

# अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी
# (वन हक्कांची मान्यता)
# अधिनियम २००६ व नियम २००८ ची अंमलबजावणी

## तुलनात्मक गोषवारा

(जून २०१२ अखेर)


| | वैयक्तीक वनहक्क | | सामुहिक वनहक्क | |
|---|---|---|---|---|
| | वाटप झालेले अभिलेख | मान्य झालेले वनक्षेत्र (एकरमध्ये) | वाटप झालेले अभिलेख | मान्य झालेले वनक्षेत्र (एकरमध्ये) |
| गडचिरोली जिल्हा | २८,१९२ | ७८,८७० | ८०५ | ३,७२,६५८ |
| नागपूर विभाग | ४०,५३० | ९९,६५८ | ८६१ | ३,७२,७२२ |
| महाराष्ट्र राज्य | १,२४,९९३ | २,४२,६१८ | १,०३३ | ३,७७,३२४ |
| ❋ भारत देश | ६,७३,२६९ | १२,९७,५४८ | २,२६७ | ४,३१,८५० |

(❋ प्रामुख्याने अंमलबजावणी झालेल्या व आकडेवारी उपलब्ध असलेल्या महाराष्ट्र, राजस्थान, छत्तीसगड, व पश्चिम बंगाल या ५ राज्यांची एकत्रित आकडेवारी)

### विशेष नोंदी

महाराष्ट्रात मंजुर झालेल्या सामुहिक वनहक्काच्या क्षेत्रापैकी ९८% वाटा गडचिरोली जिल्ह्याचा आहे.

संपूर्ण भारतात मंजुर झालेल्या सामुहिक वनहक्काच्या क्षेत्रापैकी ८६% वाटा गडचिरोली जिल्ह्याचा आहे.



## अनुसूचित जमाती व इतर पारंपारीक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८ चे अंमलबजावणी अंतर्गत प्राप्त दावे त्वरीत निकाली काढण्याच्या दृष्टीने खालील उपाययोजना करण्यात आल्या

१) देशात प्रथमच वनहक्क नियम १२(४) अनुसार गडचिरोलीतील प्रत्येक ग्राम वनहक्क समितीला स्टेशनरी, गाव नकाशे, निस्तार पत्रक, मतदार यादी, मोजणी टेप, इत्यादी अभिलेख तसेच साहित्याचे किट उपलब्ध करुन देण्यात आले होते. यामुळे ग्रामस्तरावरील वनहक्क समितीने वनहक्काचे वैयक्तीक व सामुहिक दावे करण्याची प्रक्रिया सुकर झाली. यातून जनतेला प्रथमच अभिलेख प्रत्यक्ष हाताळता आल्याने जाणीवजागृती होवुन प्रशासनाप्रती विश्वासाचे वातावरण तयार झाले.

२) सदर कायद्याची माहिती व दावा करण्याची प्रक्रिया सोप्या भाषेतील गोंडी/मराठी हँडबिलद्वारे संपूर्ण जिल्ह्यातील जनतेपर्यंत पोहचविण्यात आली. स्वयंसेवी संस्थांनी काढलेल्या पुस्तीका, चित्रफीती यांचा प्रशिक्षणात प्रभावी वापर करण्यात आला.

३) गडचिरोली जिल्ह्यामध्ये वनहक्क समितीच्या कार्यपद्धतीमध्ये एकसुत्रता आणून दावे तातडीने निकाली काढण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून एक कालबद्ध कार्यक्रम आखण्यात आला. प्रत्येक टप्प्यांसाठी कार्यवाहीच्या अनुषंगाने वेळापत्रक तयार करण्यात आले होते. त्या अंतर्गत प्रत्येक गावनिहाय ग्राम सभेची तारीख, मोजणीची तारीख निश्चित करण्यात आली. या कार्यक्रमास प्रसार माध्यमातून व्यापक प्रसिद्धी दिल्यामुळे वनहक्क समितीने दोव निकाली काढण्याच्या कामामध्ये सुसुत्रता आणि गतीशिलता आली.

४) स्वयंसेवी संस्थांचा सक्रीय सहभाग आणि नियुक्त स्वयंसेवक यांच्यामुळे ग्रामस्तरावरील वनहक्क दावे अचुक व कमीतकमी वेळेत होण्यास मदत झाली.

५) ग्रामस्तरावरील वनहक्क समितीकडून प्राप्त झालेल्या दाव्यांची संख्या ५९६०९ होती. इतक्या मोठ्या संख्येने प्राप्त झालेले दाव्यांचे निराकरण करणे हे फार मोठे काम होते. हे काम सुकर व्हावे म्हणुन जिल्हाधिकारी कार्यालयाकडून वनहक्क समितीचे दावे जलद गतीने निपटारा करण्यासाठी २ तालुक्यासाठी एक उपजिल्हाधिकारी यांची नेमणूक केली गेली.

६) सदर दावे मोजणीची कामे जलद गतीने होण्यासाठी गडचिरोली जिल्ह्यामध्ये ५२९ कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते आणि वनहक्क समितीच्या ७०१३ सदस्यांना प्रशिक्षीत करण्यात आले होते. मोजणीसाठी लागणारी जीपीएस यंत्रे विविध जिल्ह्यांमधून तसेच वनविभागाकडून मोठ्या संख्येने मिळविण्यात आली. विविध विभागातील क्षेत्रीय स्तरावरील कर्मचारी व अधिकारी यांची पथके तयार करण्यात आली.

७) वनहक्क कायदा अधिनियमांतर्गत जिल्हास्तरावरील वनहक्क समितीचे सदस्य सचिव हे अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग हे होते. ज्यांचे मुख्यालय नागपूर येथे आहे. परंतु गडचिरोली जिल्ह्याची भौगोलीक परिस्थिती, मोठ्या प्रमाणावर असलेले वनक्षेत्र व त्या अनुषंगाने प्राप्त दावे या सर्वांची सांगड घालण्यासाठी जिल्हास्तरीय समितीचे सदस्य सचिव हे अप्पर जिल्हाधिकारी ज्यांचे मुख्यालय गडचिरोली आहे यांचेकडे सोपविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यामुळे दावे त्वरेने निकाली निघाले.

८) महसूल, पंचायत, आदिवासी विकास तसेच वन विभागातील विविध स्तरावरील क्षेत्रीय अधिकारी आणि जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांमध्ये सातत्याने समन्वय असल्याने प्रक्रिया परिणामकारक झाली.

# गडचिरोली जिल्ह्यातील सामुहिक वनहक्काची पथदर्शी प्रक्रिया

गडचिरोली जिल्हा प्रशासनाने वैयक्तीक वनहक्काच्या दाव्यांची प्रक्रिया कालबध्द अभिमान राबवून जशी गतिमान केली तशीच सामुहिक हक्काची प्रक्रियासुध्दा ही पुढाकार घेणाऱ्या ग्रामसभा आणि स्वयंसेवी संस्था यांच्या सहकार्याने सुत्रबध्द रितीने आकाराला आणली. धानोरा तालुक्यातील मेंढा (लेखा) ग्रामसभेने सर्वप्रथम सामुहिक दाव्याची प्रक्रिया सुरु केली. सर्व राज्यभर आणि देशभर केवळ व्यक्तीगत पट्ट्याचेच आकर्षण असतांना या गावाने सामुहिक हिताच्या समग्र अशा वनहक्काचे महत्व जाणून स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने अभ्यास सुरु केला. हळूहळू या अभ्यासप्रक्रियेत जिल्ह्यातील अनेक संस्था, प्रशासकीय अधिकारी, संशोधक/अभ्यासक, लोकप्रतिनिधी इत्यादी सामील झाले. ग्रामसभेचे सहयोगी मित्र मोहन हिराबाई हिरालाल या सुबोध कुलकर्णी यांनी यांत विशेष लक्ष घालून सर्वसमावेशक अशी दावा तयार करण्याची सुलभ पध्दत निश्चित केली. सामान्य जनतेला समजून उमजून दावा तयार करण्यासाठीच्या सूचना, कायद्यातील व्याख्यांचे स्पष्टीकरण आणि कालबध्द कार्यपध्दती तयार झाली. महसूल आणि वन विभागातील विविध स्तरांवरील अधिकाऱ्यांनीही यामध्ये अभ्यासपूर्ण योगदान दिले. यातूनच राज्यात तसेच देशातही प्रथमच सामुहिक वनहक्काचा परिपूर्ण दावा ग्रामसभेने कसा करावा, याबाबत समग्र मार्गदर्शिका तयार झाली. सामुहिक वनहक्काची प्रभावी आणि गतिमान अंमलबजावणी करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व कर्मचारी तसेच अधिकारी यांनी या मार्गदर्शिकेचा उपयोग केला.

विविध स्तरांवर विचारमंथन, सखोल, चर्चा, इत्यादी झाल्यानंतर ग्रामसभा मेंढा (लेखा) ने १८०९.६१ हेक्टर जंगलावर केलेला सामुहिक वनहक्काचा दावा जिल्हा वनहक्क समितीने २८ ऑगस्ट २००९ रोजी मंजुर केला. या सोबतच ग्रामसभा मारदाचाही ९११ हेक्टर वनक्षेत्रावरील दावा मंजुर केला. संपूर्ण देशातील वननिवासींच्या दृष्टीने हा ऐतिहासिक निर्णय ठरला. यानंतर गडचिरोली जिल्हा प्रशासनाने सातत्याने प्रयत्न करुन स्वयंसेवी संस्थासोबत सामुहिक वनहक्काची तालुका स्तरावर प्रशिक्षणे घेतली आणि दाव्यांची प्रक्रिया पूर्ण केली. याचाच परिणाम म्हणून आजपर्यंत जवळजवळ ५५० ग्रामसभांना ४ लाख एकर वनक्षेत्राचे समग्र सामुहिक वनहक्क मान्य/मंजुर झाले आहेत. आता या कार्यपध्दतीचे राज्यभर व्यापक प्रमाणात उपयोजन होवुन सर्व वननिवासींना सामुहिक वनहक्काचा लाभ व्हावा हे उद्दिष्ट समोर ठेवून जिल्हा महसुल प्रशासन सदर मार्गदर्शिका प्रकाशित करत आहे. आपले अभिप्राय व प्रतिक्रिया यांचे स्वागत आहे.

❖❖❖



## वैयक्तीक वनहक्क दाव्याबाबतची माहिती

| प्रकार | प्राप्त दावे | निकाली काढलेले दावे | | | मान्य केलेले वन क्षेत्र (एकरमध्ये) | वाटप केलेले टायटल | वाटप केलेले क्षेत्र (एकरमध्ये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मान्य | अमान्य | एकूण | | | |
| आदिवासी | ३०,९९६ | १२,००८ | १८,९८८ | ३०,९९६ | ३७,१२५.८२ | १२,००८ | ३७,१२५.८२ |
| इतर | २८,६१३ | ८,४२० | २०,१९३ | २८,६१३ | २६,०३२.६० | ८,४२० | २६,०३२.६० |
| एकूण | ५९,६०९ | २०,४२८ | ३९,१८१ | ५९,६०९ | ६३,१५८.४२ | २०,४२८ | ६३,१५८.४२ |

## वैयक्तीक वनहक्क अपिलांची माहिती

| प्रकार | प्राप्त दावे | निकाली काढलेले दावे | | | मान्य केलेले वन क्षेत्र (एकरमध्ये) | वाटप केलेले टायटल | वाटप केलेले क्षेत्र (एकरमध्ये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मान्य | अमान्य | एकूण | | | |
| आदिवासी | ४,६०० | ३,२२२ | १,०१४ | ४,२३६ | ६,५८५.१८ | २,९३१ | ६,२७९.३७ |
| इतर | ९,६५० | ५,१८४ | १,५७३ | ६,७५७ | ९,९०३.१५ | ४,८३३ | ९,४३२.३७ |
| एकूण | १४,२५० | ८,४०६ | २,५८७ | १०,९९३ | १६,४८८.३३ | ७,७६४ | १५,७११.९० |

## सामुहिक हक्कांचे प्रकाराबाबतची माहिती

| अ.क्र. | बाब | वाटप केलेल्या पट्ट्यांची संख्या | आराजी हेक्टर मध्ये | आराजी एकर मध्ये |
|---|---|---|---|---|
| १ | चराई | ६२ | ३,४६२.६४ | ८,६५६.६० |
| २ | ढोरफोडी | १३ | ४.०३ | १०.०७ |
| ३ | स्मशानभूमी | ७८ | ७७.६४ | १९४.१० |
| ४ | देवस्थान | ६५ | २३.३८ | ५८.४५ |
| ५ | निस्तार | ४९ | ३,०२९.८४ | ७,५४७.६० |
| ६ | आकर | ०८ | २.३५ | ५.८७ |
| ७ | मासेमारी | २ | ७.२८ | १८.२० |
| ८ | शेततळे | ३ | १८.९४ | ४७.३५ |
| ९ | गाव तलाव | १ | १.३६ | ३.४० |
| १० | गावठाण | ६ | ८.७९ | २१.९७ |
| ११ | निस्तार, गौण वनउपज, चराई, जैवविविधता, अन्य पारंपारिक हक्क, जलसंपत्ती वरील हक्क | ५१८ | १,४२,४२७.०२ | ३,५६,०६७.५६ |
| | एकूण | ८०५ | १,४९,०६३.२६ | ३,७२,६५८.१७ |

## अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी अधिनियम २००६ व नियम २००८ चे अंमलबजावणी अंतर्गत मान्यता देण्यात आलेले सामुहिक वनहक्क

| अ. क्र. | तालुका | तालुक्यातील एकूण गावे | | | सामुहिक वनहक्क मंजूर झालेली एकूण गावे | मंजूर केलेल्या सामुहिक वनहक्क दाव्यांची संख्या | मंजूर केलेले सामुहिक वनहक्काचे क्षेत्र | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | आबादी गावे | रिठी गावे | एकूण गावे | | | हेक्टर मध्ये | एकर मध्ये |
| १) | गडचिरोली | ११२ | १६ | १२८ | ८० | ८० | २१,४३७.८९ | ५३,५९४.७३ |
| २) | धानोरा | २१९ | ९ | २२८ | १२९ | १२९ | ३१,९८६.४९ | ७९,९६६.२३ |
| ३) | चामोर्शी | १८५ | १९ | २०४ | २३ | २३ | ६.९३ | १७.३३ |
| ४) | मुलचेरा | ६५ | ३ | ६८ | ५४ | ८६ | ५,२८४.८० | १३,२१२.०० |
| ५) | देसाईगंज | ३४ | ५ | ३९ | २३ | २३ | ७,०६५.३१ | १७,६६३.२८ |
| ६) | आरमोरी | ९१ | १२ | १०३ | ८५ | ८५ | २५,७४७.५१ | ६४,३६८.७८ |
| ७) | कुरखेडा | १२० | ८ | १२८ | ११३ | ११३ | ३१,०२०.९७ | ७७,५५२.४३ |
| ८) | कोरची | १२७ | ६ | १३३ | ८१ | ८५ | ३०,६३८.७८ | ७६,५९६.९५ |
| ९) | अहेरी | १५७ | २७ | १८४ | ७२ | ९४ | ८,२९९.९७ | २०,७४९.९३ |
| १०) | एटापल्ली | १८९ | ८ | १९७ | ४४ | ५५ | १,३५०.०२ | ३,३७५.०५ |
| ११) | भामरागड | ११० | १८ | १२८ | २९ | ४९ | १३७.२३ | ३४३.०८ |
| १२) | सिरोंचा | ११४ | ३४ | १४८ | ५० | ६७ | १२६.६८ | ३१६.७० |
| | **एकूण** | **१,५२३** | **१६५** | **१६८८** | **७८३** | **८८९** | **१,६३,१०२.५८** | **४,०७,७५६.४६** |

# सामुहिक वनहक्क मान्यता मिळालेल्या वनक्षेत्रामध्ये ग्रामसभेद्वारे गौणवनोपजाचे व्यवस्थापन : यशोगाथा

राज्यात आणि देशात सामुहिक वनहक्क मंजुर करण्यात गडचिरोली जिल्हा जसा आघाडीवर राहिला, तसेच सामुहिक वनहक्काची प्रत्यक्ष ग्रामसभेद्वारे प्रभावी अंमलबजावणीही जिल्ह्यातच प्रथम झाली. वनाधिकार कायद्याला अभिप्रेत असलेला हक्काचा लाभ जिल्ह्यातील ६ ग्रामसभांनी मिळवून पथदर्शक काम केले.

सामुहिक वनहक्कांतर्गत कलम ३(१) (ग) अनुसार गौण वनोपजाचे स्वामित्व अधिकार ग्रामसभेस मिळाले आहेत. सदर हक्काची अंमलबजावणी करण्यासाठी मेंढा (लेखा) ग्रामसभेने स्वत:चे वन व्यवस्थापनाचे नियम बनवून प्रयत्न सुरु केले. सर्वप्रथम बांबू या गौण वनोपजाची कार्यआयोजनेनुसार कापणी व विक्री केली. इतिहासात प्रथमच ग्रामसभेला वाहतूक परवाना पुस्तक (TP Book) हस्तांतरित झाले. जिल्ह्यातील मेंढा (लेखा) गावात तत्कालीन केंद्रीय वन व पर्यावरण मंत्री मा. जयराम रमेश आणि राज्याचे मुख्यमंत्री मा. पृथ्वीराज चव्हाण यांनी स्वत: येऊन जाहीर कार्यक्रमात टी.पी. पुस्तक प्रदान केले.

सन २०१०-११ या वर्षात ग्रामसभेने कक्ष क्र. ४७१ मधून ९०,००० बांबूंची कापणी व विक्री केली. प्रतिबांबू रु. २३/- असा दर मिळाला. एकूण उत्पन्न रु. २२ लाख झाले. यापैकी रु. ८ लाख मजुरी म्हणून दिले गेले. गावातील १०० कुटूंबांनी १२ दिवसात रु. ४,००० ते रु. २०,००० चे उत्पन्न मिळविले. एकूण रु. १४ लाख ग्रामसभा विकास निधी बँक खात्यात जमा झाले. या निधीपैकी ५०% निधी वनव्यवस्थापनावर आणि ५०% निधी पुढील पिढीच्या शिक्षण/आरोग्य विषयक नाविन्यपूर्ण प्रकल्पांवर खर्च करण्याचा निर्णय सर्वसहमतीने ग्रामसभेने घेतला आहे. हे सर्व आर्थिक व्यवहार कायदेशीरपणे करण्यासाठी ग्रामसभेने PAN, TAN, VAT रजिस्ट्रेशन केले. ग्रामसभेने नियुक्त केलेल्या कार्यकारी समितीने सर्व व्यवहार पारदर्शकपणे, चोखपणे पूर्ण केले.

ग्रामसभा मेंढा (लेखा) ने २०११-१२ या वर्षासाठी सामुहिक वनहक्कांतर्गत बांबू या गौण वनोपजाच्या विक्रीसाठी निविदा प्रकिया राबविली. ग्रामसभेने स्वत:चे हित, कामाचे स्वरुप, इत्यादी लक्षात घेऊन तसेच वनविभागाची सध्याची प्रक्रिया व निविदा सुचना यांचा अभ्यास करुन सहयोगी मित्रांच्या सहकार्याने Tender Document तयार केले. प्रमुख वृत्तपत्रांमध्ये निविदा प्रसिध्द करण्यात आली. एकूण ४ व्यापाऱ्यांनी निविदा भरल्या. ग्रामसभेच्या सर्व अटी मान्य करुन जास्तीत जास्त भाव देणारी निविदा ग्रामसभेने मंजूर केली. यावर्षी रु. ३३/- प्रति लांब बांबू आणि रु. १६/- प्रति मध्यम बांबू असा दर मिळाला. ग्रामसभेने व्यापाऱ्यासोबत बांबूच्या आगावू विक्रीचा रु. एक कोटीचा करार केला. या करारांतर्गत असे ठरले की, ग्रामसभा बांबू कटाईचे संपूर्ण काम स्वत: मजुरांकरवी करेल. यांत व्यापाऱ्यांचा काहीही हस्तक्षेप असणार नाही. कक्ष क्र. ४६८ व ४७० मधून २,१६,००० लांब बांबू; ७९,००० मध्यम बांबू तसेच १७,८०० बांबू बंडल्सचे उत्पन्न झाले. ग्रामसभेच्या डेपोमधून ग्रामसभेच्या वाहतूक परवान्याद्वारे व्यापाऱ्यांकडून आधी संपूर्ण रक्कम भरुन घेऊन VAT व TDS या करांसहीत बांबू हस्तांतरीत करण्यात आला.


बांबू कापणीमध्ये मेंढ्यासहीत आजूबाजूच्या ३२ गावांमधील एकूण ४४० मजूर सहभागी झाले. प्रति कुटूंब रु. ४,००० ते रु. ४०,००० कमाई झाली. कटाईची मजूरी बँकेच्या खात्यांमध्ये जमा केली गेली. प्रत्येकाने बँकेत खाते उघडल्यामुळे इतक्या मोठ्या रक्कमेच्या वाटपातील जोखीम कमी झाली. एकूण रु ३७ लाख मजुरी दिली गेली. ग्रामसभा विकासनिधी म्हणून रु. ५७ लाख जमा झाले. असा एकूण रु. ९४ लाखाचा व्यवहार गावातल्याच युवकांनी यशस्वीपणे पूर्ण केला. बँकेचे व्यवहार, हिशोबपत्रके, कर भरणे, जंगलातील कामाचे शास्त्रीय नियोजन, वनविभागाशी समन्वय, इत्यादी सर्व जबाबदाऱ्या नियुक्त केलेल्या बांबू व्यवस्थापन समितीने कार्यक्षमतेने पेलल्या.

सन २०११-१२ या वर्षात जिल्ह्यातील सामुहिक वनहक्क मिळालेल्या इतर ५ ग्रामसभांनी त्यांच्या वनक्षेत्रातून बांबूचे उत्पन्न मिळविले. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | ग्रामसभा | कक्ष क्र. | लांब बांबू | बांबू बंडल्स |
|---|---|---|---|---|
| १. | कुपानेर | २३९, ३३८ | ९०,००० | १७,००० |
| २. | रेखाटोला | ३६१, ३६२, ३६६ | १,२१,५३१ | १२,०३३ |
| ३. | गुमडी | ३४५ | १,२३,७९७ | १७,५०० |
| ४. | कुथेगाव | ३८८ | ३०,१४३ | ६,६५० |
| ५. | नागवेली | ८७ | २,२०,९२५ | --- |







अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी

(वन हक्क मान्यता)

अधिनियम २००६ व नियम २००८ मधील

# सामुहिक वन हक्क


## तरतुदींच्या अंमलबजावणी करीता

# मार्गदर्शिका



# सामुहिक वनहक्क : मार्गदर्शिका


| प्रकरण क्र. | तपशिल | पान क्र. |
|---|---|---|
| १ | ग्रामसभेला पत्र | १–२ |
| २ | राजपत्र, प्रस्तावना – मराठीत भाषांतर, प्रमुख मुद्यांकडे निर्देश करण्याचे महत्व | ३–४ |
| ३ | ग्रामसभा व वनहक्क समिती यांनी करावयाच्या सामूहिक वनहक्काच्या दाव्याची प्रक्रिया, एका दृष्टीक्षेपात<br>कामाच्या प्रत्येक पायरीवर करावयाची कृती, वापरावयाचा नमूना व मार्गदर्शक सूचना | ५–७ |
| ४ | **वापरावयाचे नमूने** | |
| | ❖ वनहक्कांची माहिती, अभिलेख, दस्तऐवज मिळण्यासाठी अर्ज | ८ |
| | ❖ ग्रामपंचायत सरपंच यांनी द्यावयाचे प्रमाणपत्र | ९ |
| | ❖ वडीलधाऱ्या व्यक्तींचे लेखानिविष्ट कथन | १० |
| | ❖ सामूहिक दावा अर्ज भरण्यासंबंधी सूचना | ११–१२ |
| | ❖ सामूहिक वनहक्काच्या दाव्याचा अर्ज | १३–२१ |
| | ❖ पडताळणी व ग्रामसभा अहवाल भरण्यासंबंधी सूचना | २२–२३ |
| | ❖ वनहक्क समितीने द्यावयाची पडताळणीची नोटीस | २४ |
| | ❖ वनहक्क समितीचा पडताळणी अहवाल | २५–२७ |
| | ❖ ग्रामसभेची नोटीस | २८ |
| | ❖ ग्रामसभा ठराव | २९–३१ |
| | ❖ दाव्याच्या अर्जाचे कव्हरिंग लेटर | ३२ |
| | ❖ स्मरणपत्र | ३३ |
| | ❖ माहितीच्या अधिकारांतर्गत करावयाचा अर्ज | ३४ |
| **परिशिष्टे** | | |
| I | व्याख्या | ३५ |
| II | वनहक्क | ३६ |
| III | वनहक्क निश्चित करण्यासाठी पुरावा | ३७ |
| IV | वनहक्क धारकाची कर्तव्ये | ३८ |
| V | वन जोपासना व व्यवस्थापन | ३९ |
| VI | निस्तार हक्क : अर्थ आणि स्थिती | ४० |
| VII | सामूहिक वनहक्क अभिलेख – ग्रामसभा मेंढा (लेखा) | ४१ |

## प्रकरण - १

भारत सरकारच्या

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम २००६ व नियम २००८ अंतर्गत तरतुदींची माहिती होवून त्यांचा प्रत्यक्ष लाभ घ्यावा या करीता...

# ग्रामसभेला पत्र

प्रति,

आदरणीय ग्रामसभा ..............................................................

मार्फत सचिव, ग्रामसभा ............................................... तथा

ग्रामसेवक, ग्राम पंचायत ........................................................

ता. ................................ उपविभाग ....................................

जि. गडचिरोली

**संदर्भ : वनहक्क मान्यता नियम २००८ अंतर्गत कलम (६) उपविभागस्तरीय समितीची कार्ये-अनुसार**

**विषय : आपल्या ग्रामसभेच्या पारंपारिका निस्तार हक्क, गौण वनोपजावर स्वामित्व अधिकार व इतर सामुहिक वन हक्कांना कायदेशीर मान्यता मिळवून घेवून ऐतिहासिक अन्याय दूर करण्यासाठी वन हक्क कायद्यातील तरतुदीनुसार दावा करणेबाबत.**

महोदय,


सप्रेम नमस्कार !

**१) आपल्याला हे माहित आहे काय ?**

१.१ वनहक्क कायद्याअंतर्गतची ग्रामसभा म्हणजे ग्राम पंचायतीची ग्रामसभा नव्हे. एका घटक गावातील किंवा दुर्गम आदिवासी भागात टोला, पाडा किंवा एका लहान वस्तीमधील सर्व प्रौढ स्त्री पुरुषांची मिळून बनलेली सभा म्हणजे त्या गावाची कायदेशीर ग्रामसभा होय.

१.२ नियम ११)६. मध्ये ''ग्रामपंचायतीचा सचिव त्याची कर्तव्ये पार पाडताना ग्रामसभेचा सचिव म्हणूनही काम पाहील.'' असे स्पष्ट नमुद कलेले आहे. याचाच अर्थ या कायद्याअंतर्गत आवश्यक ती सर्व कामे ग्रामसभेने सचिवाकडून करून घ्यावयाची आहेत व ती त्याने त्याचे कर्तव्ये म्हणून करावयाची आहेत.

१.३ आपल्या ग्रामसभेच्या पारंपारिक निस्तार हक्क, बांबू व तेंदुपत्त्यांसह सर्व गौण वनोपजावर स्वामित्व अधिकार (मालकी हक्क) व इतर सामुहिक वन हक्कांना कायदेशीर मान्यता देण्यासाठी भारत सरकाने **''अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम २००६ व नियम २००८''** मंजुर केले असुन त्याची अंमलबजावणी अजुन सुरु आहे. नियमाप्रमाणे दावा सादर करण्याकरीता दिलेली मुदत संपल्याचे सरकार जाहीर करु शकते. आपले परंपरागत वन हक्क असतील तर त्याचा कायदेशीर दावा मुदत संपण्यापूर्वी सादर करण्याची काळजी घेणे आवश्यक आहे.



१.४ या कायद्याने आपल्या गावसमाजाचे वन जमिनीवरील परंपरागत निस्तार, गौण वन उत्पादने, जलसंपत्ती, चराई व वन व्यवस्थापनाचे सामुहिक हक्क यांना कायदेशीर मान्यता मिळू शकते.

१.५ सामुहिक हक्क असलेल्या अशा वनक्षेत्रातील वन, वन्यजीव व जैवविविधता यांचे संरक्षण, संवर्धन व व्यवस्थापनाचे कर्तव्य करण्याकरीता या कायद्याने ग्रामसभेला शक्ती देवून सबल केले आहे.

**२) असे झाले आहे !**

२.१ असे खरोखर होवू शकते काय ? अशी शंका आपल्या मनात येणे अत्यंत स्वाभाविक आहे. परंतु असे प्रत्यक्षात घडले आहे.

२.२ मेंढा (लेखा), ग्रामपंचायत लेखा, ता. धानोरा, जि. गडचिरोली या एका गावाच्या ग्रामसभेने त्यांच्या १८०९.६१ हेक्टर वन जमिनीवर सामुहिक वन हक्क मिळवून घेतले आहेत. जोडपत्र तीन मध्ये ग्रामसभा, मेंढा (लेखा)ला मिळालेल्या अधिकार अभिलेखाची सत्यप्रत परिशिष्ट–VII म्हणून आपल्या माहितीसाठी सोबत जोडली आहे..

२.३ सामुहिक वनहक्काचा फक्त कागद मिळाला असे नाही तर २०११–१२ वर्षात ग्रामसभेने आपले स्वत:चे नियम बनवून योग्य पध्दतीने बांबूची कटाई व विक्री केली. सुमारे एक कोटी रुपयांची उलाढाल होवून ग्रामसभा मेंढा (लेखा)ला पन्नास लाख रुपयांचे निव्वळ उत्पन्न मिळाले. त्यापैकी ५०% रक्कम वनविकास कामावर व ५०% रक्कम प्राथमिकतेने शिक्षण व आरोग्य विकास कामांवर खर्च करण्याचा निर्णय घेवून ग्रामसभा स्वत:ची कार्यआयोजना तयार करीत आहे.

**३) तुम्हालाही असे सामुहिक वनहक्क मिळवून घ्यायचे असल्यास –**

३.१ आपल्या गाव समाजाचा सामुहिक वनहक्क दावा तयार करुन नियमाप्रमाणे पडताळणी व ग्रामसभेच्या मंजुरीची प्रकिया पूर्ण करुन उपविभागस्तरीय समितीकडे लवकर सादर करणे आवश्यक आहे.

३.२ असा दावा तयार करावा ? पडताळणी कशी करावी ? ग्राम सभेत दावा मंजुरीकरीता काय करावे ? अहवालासह दावा उपविभागस्तरीय समितीकडे कसा सादर करावा त्यानंतर आपले सामुहिक वनहक्क मिळेपर्यंत त्याचा पाठपुरावा कसा करावा ? हे सांगण्यासाठीच ही पुस्तिका आपल्याला पाठविली आहे. आधीच उशीर झाला आहे. आता आणखी वेळ वाया घालवून चालणार नाही. मग लागा आता कामाला. काही अडचणी आल्यास आम्ही आहोतच आपल्या मदतीला....

सस्नेह....

ग्रामसभेच्या हिताची कायदेशीर काळजी घेण्यासाठी तत्पर...

उपविभागीय अधिकारी तथा अध्यक्ष, उपविभागस्तरीय समिती

उपविभाग .................................

जिल्हा – गडचिरोली (म.रा.)

सहयोगी मित्र संपर्क :

**देवाजी नवलु तोफा** सदस्य – ग्रामसभा मेंढा (लेखा) मो. नं. ९४२१७३४०१८

**मोहन हिराबाई हिरालाल** संयोजक – ''वृक्षमित्र'' मो. नं. ९४२२८३५२३४

**सुबोध कुलकर्णी** समन्वयक – ''ज्ञान प्रबोधिनी'' मो. नं. ९४२२९०७३३०

❖❖❖

प्रकरण - २

रजिस्ट्री सं० डी० एल०—(एन)04/0007/2006—08 REGISTERED NO. DL—(N)04/0007/2006—08

भारत का राजपत्र
The Gazette of India

असाधारण
EXTRAORDINARY
भाग II — खण्ड 1
PART II — Section 1
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं० 2] नई दिल्ली, मंगलवार, जनवरी 2, 2007 / पौष 12, 1928
No. 2] NEW DELHI, TUESDAY, JANUARY 2, 2007 / PAUSA 12, 1928

इस भाग में भिन्न पृष्ठ संख्या दी जाती है जिससे कि यह अलग संकलन के रूप में रखा जा सके।
Separate paging is given to this Part in order that it may be filed as a separate compilation.

MINISTRY OF LAW AND JUSTICE
(Legislative Department)

*New Delhi, the 2nd January, 2007/Pausa 12, 1928 (Saka)*

The following Act of Parliament received the assent of the President on the 29th December, 2006, and is hereby published for general information:-

THE SCHEDULED TRIBES AND OTHER TRADITIONAL FOREST DWELLERS (RECOGNITION OF FOREST RIGHTS) ACT, 2006

No. 2 OF 2007

[*29th December,* 2006]

# अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६ आणि नियम २००८

**प्रस्तावना :**

गडचिरोली जिल्ह्यामध्ये ऐंशी टक्के पेक्षा जास्त भूभाग जंगलाने व्याप्त आहे व तेरा टक्के इतक्या अत्यल्प भूभागावर मागास पद्धतीने केली जाणारी शेती आहे. अशा ठिकाणी लोकांची उपजिवीका परंपरेने व यापुढेही वनावरच अवलंबून असणार आहे. तरीही अशा विदारक परिस्थितीत अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्क मान्यता) अधिनियम – २००६ अंतर्गत सामूहिक वन हक्काच्या माध्यमातून गाव समाजांना वनाचे सामुहिक अधिकार देण्याऐवजी काही मूठभर लोकांना जमिनीच्या पट्ट्यासाठी क्लिष्ट कागदपत्रांच्या गोंधळात अडकवून ठेवण्यातून आपण काय साधतो आहोत ? ज्या उदात्त व प्रामाणिक हेतूने या कायद्याचा जन्म झाला आहे, त्याकडे विविध स्तरावर दुर्लक्ष्य

होत आहे. वनहक्क कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या सर्वांची दृष्टी व्यापक करणारी सदर कायद्याची प्रस्तावना अशी आहे –

''हा कायदा अशा वननिवासी अनुसूचित जमाती व पारंपारिक वननिवासींकरीता केला गेला आहे, ज्यांचे वास्तव्य पिढ्यानपिढ्या जंगलात असूनही त्यांच्या हक्कांची कोणत्याही प्रकारची नोंद घेतली गेली नाही आणि अधिकारांना मान्यता दिली गेली नाही. असे वनहक्क न्याय्यपणे नोंदवून त्याचे अभिलेख तयार करण्याची रचना निर्माण करुन त्यासाठी आवश्यक अशा विविध पुराव्यांचे स्वरुप सुनिश्चित करण्याची हमी हा कायदा देत आहे.

वनहक्कांमध्ये संसाधनाचे शाश्वत वापरासाठीचे अधिकार व जबाबदारी यांचा समावेश होतो. तसेच वापराच्या क्षेत्रातील जैवविविधतेचे सरंक्षण व पर्यावरणाचे संतुलन राखण्याच्या दृष्टीने व्यवस्थापन करण्याचे अधिकार गाव समाजाला देवून वनव्याप्त क्षेत्राची विकासप्रक्रिया मजबूत केली आहे. त्याचवेळी त्यात सहभागी असलेल्या स्थानिक जनतेची उपजिवीका व अन्न सुरक्षा यांची खात्री हा कायदा देत आहे.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासींचे त्यांच्या परंपरागत जमिनी व वास्तव्य असलेल्या भूप्रदेशावरील वनहक्क हे ब्रिटीश वसाहतकाळात आणि स्वातंत्र्योत्तर काळातही झालेले वन बंदोबस्त व इतर धोरणांत योग्य प्रकारे मान्य न केल्यामुळे या वननिवासींवर ऐतिहासिक अन्याय झाला आहे. कारण वननिवासींचे जीवनच मुळी 'वन' या पर्यावरणीय परिसंस्थेच्या अस्तित्वाशी व त्याच्या टिकावू विकासाशी एकात्म झालेले आहे.

आणि अशाप्रकारे प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असलेल्या हक्कांविषयीची असुरक्षिततेची भावना योग्यप्रकारे संबोधित करुन ती दुर करणे हे अत्यंत आवश्यक झाले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विकासाच्या योजनांमुळे जबरदस्तीने ज्यांचे त्यांच्या उपजिवीका क्षेत्रामधुन विस्थापन झाले अशांनाही न्याय देणे हे कायद्याचे उद्दिष्ट आहे.''

ज्या ज्या सामूहिक वनहक्कांपासून वंचित ठेवल्यामुळे वननिवासींवर ऐतिहासिक अन्याय झाला, त्या वनहक्कांना मान्यता देऊन तो अन्याय दूर करण्याचे मुख्य ध्येय कायद्याच्या वरील प्रस्तावनेतून स्पष्ट होते. वनाजवळ परंपरागत वास्तव्य असणाऱ्या गावसमाजांची शाश्वत उपजिवीका व विकास हा परंपरेने वापरात असलेल्या सामूहिक वनस्त्रोतांवरच अवलंबून आहे. म्हणूनच वैयक्तिक हक्कांपेक्षा अधिक महत्व व प्राधान्य हे सामूहिक वनहक्काच्या अंमलबजावणीला नियमांतही दिलेले आहे परंतू दुर्दैवाने सर्वांचे लक्ष हे फक्त वैयक्तिक जमिनीच्या (पट्टा) दाव्यावर आहे. सामूहिक वनहक्क म्हणजे गावातील शाळा, दवाखाने यासारख्या सार्वजनिक वापराच्या जागांचा हक्क असा चुकीचा समजही सर्व ठिकाणी पसरला आहे.

वननिवासी गाव समाज हे परंपरेने सामूहिक हक्कांचा उपभोग घेत आहेत. त्यांचे अस्तित्वच मुळी त्यावर टिकुन आहे. अर्थात आता हे वनहक्क शासनाकडे मागायचे किंवा त्यासाठी प्रस्ताव करायचा असे नसून कायद्यात म्हटल्याप्रमाणे आपण त्यावर दावा करायचा व शासनाने त्याला मान्यता द्यावयाची आहे. तरी आता गाव समाजाने जागृत होऊन तातडीने सर्वांच्या सहभागाने कायद्याची समज बनविणे, सामूहिक वनसंसाधनांचे क्षेत्र निश्चित करणे, दावा तयार करण्यासाठी आवश्यक माहिती व कागदपत्रे मिळविणे, अभ्यासगट तयार करुन सर्व महसूल/वनअभिलेख वाचणे इत्यादी प्रक्रिया सुरु करणे अत्यावश्यक आहे.

ग्रामसभेने करावयाच्या प्रक्रियेतील विविध पायऱ्या अनुक्रमे कशा आहेत हे पुढील पानावर थोडक्यात दिले आहे. त्यानंतर प्रत्येक पायरीसाठी वापरावयाचा नमूना व मार्गदर्शक सूचना पुढील भागांमध्ये दिल्या आहेत. कायदा व नियमांतील महत्वाचा भाग संदर्भासाठी परिशिष्टांमध्ये जसाच्या तसा दिला आहे.

❖❖❖

## प्रकरण - ३


# ग्रामसभा व वनहक्क समिती यांनी करावयाची प्रक्रिया

| पायरी क्र. | कृतीचा तपशिल | वापरावयाचा नमूना पहा पान क्र. |
|---|---|---|
| १) | **वनाधिकार कायद्याची माहिती, अंमलबजावणीचे अर्ज, दाव्यासाठी आवश्यक नमूने, दस्तऐवज व अभिलेख मिळविणे :**<br>पहा नियम (६) उपविभागस्तरीय समित्यांची कार्ये :<br>कलम (ख) - उ. वि. समिती ग्रामसभा किवा वनहक्क समिती यांना वन/महसुल नकाशे व मतदार यादी पुरवील.<br>आणि नियम (१२) कलम (४) - ग्रामसभा किंवा व.ह.स. यांनी माहिती अभिलेख व दस्ताऐवज मिळविण्यासाठी लेखी विनंती केल्यावर संबंधीत अधिकारी त्याची अधिप्रमाणित प्रत ग्रामसभेकडे किंवा यथास्थिती व.ह.स. कडे पाठवील आणि आवश्यक असल्यास, अधिकृत अधिकाऱ्याद्वारे त्याचा अर्थ सुकर करण्यात येईल.<br>या वरील नियमांच्या आधारे उपविभागीय अधिकाऱ्यांना उद्देशून लेखी अर्ज करणे. | नियम-१२ (४) अनुसार लेखी विनंती अर्ज<br>☞ पान क्र. ८ |
| २) | **निस्तारपत्रक, महसूल व वन अभिलेख यांच्या आधारे सामूहिक वन क्षेत्राच्या हद्दी निश्चित करणे. वनसंसाधनांची स्थानिक नावासहित यादी बनविणे व तपशिल नकाशावर नोंदविणे :**<br>निस्तारपत्रक नसल्यास परंपरागत वापराच्या क्षेत्राच्या चतु:सिमा निश्चित करुन तपशिलवार वर्णन/महत्वाच्या खुणांसह तयार करावे. तसेच पुरावा म्हणून शेजारच्या गावातील २ ज्येष्ठ व्यक्तींचे कथन २ साक्षीदार व वनहक्क समितीसमोर नोंदवून संबंधिताच्या सह्या/अंगठे घ्यावेत. (नियम १३ कलम १ - झ)<br>जर एकाच वनक्षेत्राचा सामूहिक वापर एकापेक्षा अधिक गावे करत असतील तर संबंधित ग्रामसभांच्या वनहक्क समित्या संयुक्त वापरासंबंधी लेखी ठराव करुन ग्रामसभांना सादर करतील. (नियम १२ कलम ३)<br>मागणीदारांचा समूह अनुसूचित जमाती किंवा पारंपारिक वननिवासी असल्यासंबंधीचे प्रमाणपत्र विहीत नमुन्यात सरपंचांकडून घेणे. | वडीलधाऱ्या व्यक्तींचे लेखानिविष्ट कथन<br>☞ पान क्र. १०<br>सरपंच प्रमाणपत्र<br>☞ पान क्र. ९ |
| ३) | **गावातील सर्व लोकांच्या सहभागाने सामूहिक वनहक्काचा दावा तयार करणे :**<br>मार्गदर्शिकेत दाव्याच्या अर्जाचा जो नमुना दिला आहे, त्याची झेरॉक्स प्रत करुन करण्यासाठी वापरावा. दावा तयार करण्यासाठीच्या सुचना (पान क्र. ११ ते १२) काळजीपूर्वक वाचून अभिलेखांच्या आधारे योग्य तो मजकूर लिहावा. (नियम ४ व नियम ११) | सामूहिक वनहक्काच्या दाव्याचा अर्ज<br>☞ पान क्र. १३ ते २१ |


| पायरी क्र. | कृतीचा तपशिल | वापरावयाचा नमूना पहा पान क्र. |
|---|---|---|
| ४) | **वनहक्क समितीने दाव्याची पडताळणी प्रक्रिया करणे :**<br>सर्वप्रथम व.ह.स. सचिवांच्या सहीने काढलेली लेखी पूर्वसूचना (नोटीस) संबंधित विभागांना ७ दिवस आधी देऊन पोच घ्यावी.<br>वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना नोटीससोबत दाव्याच्या अर्जाची झेरॉक्स प्रतही द्यावी. (नियम - १२) | पडताळणी सूचना ☞ पान क्र. २४ |
| ५) | **नियम -१२ (२) अनुसार पडताळणी निष्कर्ष अहवाल तयार करणे :**<br>मार्गदर्शिकेतील ''व.ह.स. चा पडताळणी निष्कर्ष सामूहिक दाव्यासंबंधी शिफारस'' असे शीर्षक असलेला नमुना यासाठी वापरायचा आहे. या अहवालात कोणते तपशिल भरायचे, याविषयाच्या सूचना पान क्र. २२-२३ मध्ये दिल्या आहेत. | नमुना पहा - ☞ पान क्र. २५ ते २७<br>भरण्यासाठी सूचना पहा ☞ पान क्र. २२ ते २३ |
| ६) | **नियम १२ (२) व नियम ११ (५) अनुसार पडताळणी निष्कर्ष अहवाल ग्रामसभेसमोर विचारार्थ मांडण्यासाठी ग्रामसभा बोलावण्याकरीता नोटीस काढणे**<br>या ग्रामसभेची नोटीस नियम ११ (६) नुसार ग्रामपंचायतीचे सचिव म्हणजेच ग्रामसेवक यांनी काढुन संबंधित विभागांना द्यायची आहे. | ग्रामसभेची सुचना ☞ पान क्र. २८ |
| ७) | **वनहक्क समितीने नियम ११ कलम २.५ नुसार ग्रामसभेपुढे निष्कर्ष सादर करणे आणि ग्रामसभेने त्यावर विचार करुन नियम ११ (५) नुसार ठराव संमत करणे :**<br>मार्गदर्शिकेतील ''सामूहिक वनहक्क दाव्याच्या संदर्भात आयोजित ग्रामसभा'' या शीर्षकाचा नमुना ठराव भरण्यासाठी वापरावा.<br>सदर नमुना भरण्यासाठीच्या सुचना पान क्र. २२ व २३ वर दिलेल्या आहेत. ग्रामसभेची रीतसर कार्यवाही सचिव, ग्रामसेवक यांच्या सहकार्याने पूर्ण करुन सविस्तर ठराव व अहवाल तयार करावेत.<br>ग्रामसभेसाठी आवश्यक गणपूर्तीची (कोरम) सदस्य असेल याची खात्री करावी. दोन तृतीयांश म्हणजे शंभरापैकी किमान ६७ सदस्य, हिशोबाच्या सोयीसाठी अंदाजे ७०% (सत्तर टक्के म्हणजेच किमान १५० पैकी १०५ सदस्य, किंवा २०० पैकी १४० सदस्य हजर असणे.)<br>एकुण ग्रामस्थ म्हणजे गावाच्या मतदार यादीत ज्यांची नावे आहेत असे सर्व ग्रामस्थ स्त्री व पुरुष. | नमुना पहा - ☞ पान क्र. २९ ते ३१<br>भरण्यासाठी सूचना पहा - ☞ पान क्र. २२ ते २३ |

| पायरी क्र. | कृतीचा तपशिल | वापरावयाचा नमूना पहा पान क्र. |
|---|---|---|
| ८) | **नियम - ११ (५) अनुसार ग्रामसभेने उपविभागीय अधिकारी, अध्यक्ष, उपविभागस्तरीय समिती यांचेकडे सर्व कागदपत्रांसह दावा दाखल करणे :** दिलेल्या नमुन्यानुसार उपविभागीय अधिकारी यांना पत्र तयार करुन सामूहिक वनहक्काचा दावा उल्लेखित सर्व कागदपत्रांसह कार्यालयात दाखल करावा. मार्गदर्शिकेतील नमुन्यांवरचे मूळ पान क्र. खोडून नव्याने क्रमाने पान क्रमांक द्यावेत. | उपविभागीय अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले पत्र ☞ पान क्र. ३२ |
| ९) | **दाव्याच्या कार्यवाहीसाठी पाठपुरावा करणे :** दावा दाखल केल्यानंतर अनुक्रमे ७ व १५ दिवसांनी दिलेल्या नमुन्याप्रमाणे स्मरणपत्रे उपविभागीय अधिकाऱ्यांना द्यावीत. | स्मरण पत्र ☞ पान क्र. ३३ |
| १०) | **कार्यवाहीसंबंधी तपशिल माहितीच्या अधिकारात मागणे :** दावा दाखल केल्यानंतर १ महिन्याने माहितीच्या अधिकारांतर्गत कार्यवाही नोटशीटवरील नोंदींसह माहिती मागावी. | माहितीच्या अधिकारांतर्गत अर्ज ☞ पान क्र. ३४ |

❖❖❖









## वनहक्क समिती, ..................................

**ग्रामपंचायत ..................., तालुका ........................., जि. ............................**

प्रति,

मा. अध्यक्ष,
उपविभाग स्तरीय समिती तथा
उपविभागीय अधिकारी ................................,
जिल्हा ..........................

**विषय : नियम १२ (४) अनुसार माहिती, अभिलेख व दस्तऐवज मिळण्यासाठी लेखी विनंती अर्ज.**

महोदय,

वनहक्क दावा संबंधीत कार्यवाहीकरीता खालील माहिती, अभिलेख व दस्तऐवज आवश्यक आहे.

१. ....................... गावाचे निस्तारपत्रक, वाजिबुल अर्ज, बंदोबस्त मिसल, वन व महसुल नकाशे, मतदार यादी, तलाठी दप्तरातील शेती व वन जमिनीच्या नोंदी असलेले नमूने.

२. १ ला ५०००० प्रमाण असलेला राजस्व व वन नकाशा सर्व तपशिलासह.

३. संबंधीत वनकार्य आयोजनेच्या सत्यप्रती.

४. महा.शा.नि.क.ए.एस.३०/२००० प्र.क्र. २१५/क ६ – दि. १०.११.२००० द्वारा गठीत निस्तार आढावा समितीचा अहवाल.

५. ......................... जिल्हा गॅजेटीयरची सत्यप्रत

६. जैवविविधता अधिनियम २००२ चे कलम ४१ ची सत्यप्रत.

७. जैवविविधता नियम २२ ची सत्यप्रत

८. भारत सरकार, आदिवासी मंत्रालयाचे पत्र क्र. २३०११/१५/२००८ एस जी २ दि. १८ मे २००९ प्रमाणे फॉर्म–जे (पहा परिच्छेद २.२ (१)) वन जमिनीचा वनेत्तर उपयोग करण्यासाठी गाव समूहाने भरावयाच्या फॉर्मच्या मराठी प्रती.

९. गावाला लागून असलेल्या वनक्षेत्रातुन होणारे गौण वनोत्पादन – गत १० वर्षाची प्रतिवर्ष प्रती वनोत्पादन प्रमाणे परिमाण (किलो) अनुसार माहिती.

तरी वरील आवश्यक माहिती, दस्ताऐवज व अभिलेख त्वरीत उपलब्ध करुन द्यावेत व सुयोग्य व्यक्तीस पाठवून समजावून देण्याची व्यवस्था करावी ही विनंती.

सहकार्याच्या अपेक्षेत,

दिनांक : आपले विनीत

ठिकाण :

**(अध्यक्ष/सचिव)**

वनहक्क समिती .................................

(खालील प्रमाणपत्र ग्रामपंचायतच्या लेटरहेडवर तयार करावे.)

## ग्रा. पं. सरपंच यांनी द्यावयाच्या प्रमाणपत्राचा नमुना

ग्राम पंचायत : दिनांक :

पत्ता :

फोन नंबर :

### प्रमाणपत्र

वन जमिनीच्या सामुहिक हक्कांसाठीच्या दाव्याच्या अर्जावर ज्यांचे मागणीदार म्हणून नांव आहे, ते सर्व सदस्य (एकूण मतदार ........................................) एकतर मुख्यत्वे करुन वनात राहणारे अनुसूचित जमातीचे (एकूण संख्या ................) आहेत किंवा इतर पारंपारिक वननिवासी (एकूण संख्या ..................) आहेत.

वर उल्लेखित दोन्ही प्रकारचे मागणीदार हे मुख्यत्वेकरुन वनांवर किंवा उपजिविकेच्या खऱ्याखुऱ्या गरजांसाठी वनांवर किंवा वनजमिनीवर अवलंबुन आहेत.

करीता सबब प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

दिनांक : **सही, नाव व शिक्का**

ठिकाण :

**(ग्रा. पं. सरपंच)**

# वडीलधाऱ्या व्यक्तींचे लेखानिविष्ट कथन

## (नियम (१३) कलम (१) झ अनुसार पुरावा)

आम्ही खाली सही/अंगठा करणारे, सदर सामूहिक वनहक्काच्या मागणीदाराखेरीज अन्य व्यक्ती असून हे लेखी कथन पुढीलप्रमाणे करीत आहेत.

संबंधित सामूहिक वनहक्काच्या दाव्यामध्ये दाखविलेले सामूहिक वनसंसाधनांचे पारंपारिक वापराचे क्षेत्र खालील चतु:सीमेप्रमाणेच आहे. या कच्च्या नकाशात चतु:सीमेबरोबरच नदी, नाले, झरे, तलाव, देवांच्या जागा इ. प्रमुख जागा व खुणाही दर्शविलेल्या आहेत.

**उत्तर दिशा** ↑

सदर मागणीदार आमच्या परिचयाचे असून वरील चतु:सीमा सत्य आहेत. तसेच मागणीदार हे उपजिविकेच्या खऱ्याखुऱ्या गरजांसाठी वरील क्षेत्रांचा वापर करीत आहेत व या वनक्षेत्रावर त्यांचा परंपरागत अधिकार आहे.

| क्र. | नांव | गाव | ग्रा.पं. | तालुका/जिल्हा | सही/अंगठा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**साक्षीदार :** कथन करणाऱ्या वरील व्यक्तींना आम्ही ओळखत असून आमच्या समक्ष हे कथन वाचून, समजून घेऊन त्यांनी स्वत:च्या मर्जीने कोणत्याही दबावाशिवाय मान्य करुन सही/अंगठा केला आहे.

वनहक्क समिती – अध्यक्ष/सचिव
गांव ....................................

वनहक्क समिती – सदस्य
गांव ............................

# वनहक्क जमिनींच्या सामुहिक हक्कांसाठी दाव्याचा अर्ज कसा करावा ?

**१) मागणीदाराचे नाव :**

- पहिले नांव गावातील प्रतिष्ठित व अभ्यासू व्यक्तीचे लिहावे. पुढील पत्रव्यवहार याच नावाने होण्याची शक्यता लक्षात घेवून नावाची निवड करावी.
- पहिल्या पानावर फक्त ९ जणांची नांवे लिहावीत. गावाच्या मतदार यादीतील बाकी सर्व नांवे व सह्यांचे स्वतंत्र कागद अर्जास जोडावे. सर्व मतदारांची नांवे घ्यावीत. शक्यतो कुणाला वगळु नये.
- ज्या व्यक्तींचे नांव आहे त्याचीच सही किंवा अंगठा घ्यावा. ती व्यक्ती तेंव्हा हजर नसल्यास सही-अंगठ्याची जागा रिकामी ठेवावी, इतर कुणीही सही अंगठा करु नये. खोटी सही किंवा अंगठा सापडल्यास गुन्हा दाखल होवून अर्जही खारिज होवू शकतो.
- सही नसली तरी गावाचा दावा मंजुर झाल्यास यादीत नांव असलेल्या त्या व्यक्तीलाही वनहक्क मिळतीलच.
- अर्जदार अनुसूचित जमातीचा असल्यास त्याच्या नांवापुढे अ.ज. कॉलममध्ये व इतर पारंपारिक असल्यास इ.पा. कॉलममध्ये (✔) अशी खुण करावी. मतदार, अर्जदारांची एकूण संख्या व त्यात अ.ज. आणि इ.पा. ची संख्या किती आहे ते मोजून घ्यावे.

**१. (क) व (ख) :** होय किंवा नाही यापैकी ते ठेवून अयोग्यवर काट मारावी व त्यापुढे एकुण संख्या लिहावी.

**२. ३. व ४. :** रिकाम्या जागेत गाव, ग्रामपंचायत व तालुका जे असेल त्याप्रमाणे लिहावे. पुढे प्रत्येक पानावरसुद्धा रिकाम्या जागेत गाव, ग्रामपंचायत व तालुका जे असेल त्याप्रमाणे लिहावे.

# लाभ घेतलेल्या सामुहिक हक्कांचे स्वरूप

**१. निस्तारसारखे सामुहिक हक्क :**

निस्तार पत्रकातील 'चराई' आणि 'इमारत व जलाऊ लाकुड इत्यादी संबंधी कटीबंध' या मुद्यांशी संबंधित टेबलमध्ये असलेले एकुण क्षेत्रफळ आराजी पहावे. दोन्हीपैकी जे जास्त आहे ते क्षेत्र लिहावे. सर्व खसरा नं. व क्षेत्रफळाचे तपशिल लिहू नयेत.

निस्तारपत्रक नसल्यास किंवा नंतर असलेला मजकूर लागू होईल. तो तसाच ठेवून दुसरा मजकुर खोडावा. याचप्रमाणे कॉलम-२ व कॉलम-३ मध्ये करावे.

निस्तारपत्रक नसलेल्या गावसमाजाने त्यांच्या परंपरागत वापराच्या वनक्षेत्राच्या चतु:सीमेचे अचुक वर्णन महत्वाच्या खुणांसह करावयाचे आहे. तसेच गाव नकाशाचा आधार घेऊन सीमेचे आरेखन करावे.

तसेच पुरावा म्हणून वरील चतु:सीमेला लागून ज्या गावांच्या सीमा आहेत अशांपैकी कमीतकमी एका गावाच्या वनहक्क समितीसोबत चर्चा करुन परंपरागत वापर सुनिश्चित करण्याची आवश्यकता आहे. शक्य असल्यास दोन ते तीन गावांशीही चर्चा करावी. पान क्र. १० वर दिलेला लेखानिविष्ट कथनाचा नमुना त्या गावातील वडीलधाऱ्या व्यक्तींकडुन भरुन तयार करावा. तसेच वनहक्क समितीसोबत संयुक्त बैठक घेऊन ठराव करावा. याच बैठकीत समितीसमोरच वरील कथन घ्यावे व खाली दोन साक्षीदारांच्या सह्या घ्याव्यात.

२. **गौण वनौत्पादन :** वरील प्रमाणेच एकुण क्षेत्रफळ किंवा चतु:सीमा वर्णन लिहावे.

३. **सामुहिक हक्क :**

**क) जलसंपत्ती :** आपल्या गावाशी संबंधित – नदी, झरे, नाले, तलाव यांची यादी करावी. क्षेत्र वरील प्रमाणेच लिहावे.

झरे व तलावाची जागा दाखवणारा कच्चा नकाशा पान नं. २१ वर दिलेल्या नमुन्यात तयार करावा. प्रत्येक जागेला क्रमांक देवून खाली त्याच क्रमांकापुढे त्याचे स्थानिक भाषेतील नांव लिहावे. हा कच्चा नकाशा स्केल प्रमाणे मोठ्या कागदावर असणे आवश्यक नाही.

**ख) चराई :** पहिल्या दोन कॉलममध्ये ............. जागेत गावाचे नांव लिहावे.

- एकुण क्षेत्रफळ किंवा चतु:सीमा वर्णन वरील प्रमाणेच लिहावे.

६. **अन्य पारंपारिक हक्क :**

- पहिल्या कॉलममध्ये देवांच्या जागांची नांवे स्थानिक भाषेतील जशी असतील तशी लिहावी.
- क्षेत्राच्या कॉलममध्ये वरिलप्रमाणेच लिहावे. झरे व तलावाच्या जागा दाखविणारा जो कच्चा नकाशा तयार केला आहे, त्यातच नंबर देवून देवाच्या जागाही दाखवाव्यात.

७. **पुरावे :** यातील १० पैकी जे पुरावे नसतील त्यावर काट मारावी. याशिवाय असलेले पुरावे ११, १२ व १२ समोर लिहावेत.

८. **कोणतीही अन्य माहिती :**

- रिकाम्या जागेत ग्रामपंचायतीचे नांव लिहा.
- पावतीशी संबंधीत सर्व रिकाम्या जागा योग्य प्रकारे भरा.
- पुस्तिकेतील मुळ नंबर खोडून सर्व पानांना क्रमाने पुन्हा नंबर द्या व एकूण पानांचा आकडा व दिनांक लिहा.
- वनहक्क समितीच्या सचिवाची सही घेतांना त्याचे नांवही स्पष्ट लिहा व शिक्का घ्यायला विसरु नका.

**पान क्र. १९ पासून पुढे .........**

- क्र. १० पासुन पुढील नांवे लिहा. पाने कमी पडल्यास पान नं. २० च्या झेरॉक्स काढून वापरा.

**सरपंचाचे प्रमाणपत्र :**

- सर्व रिकाम्या जागा योग्य प्रकारे भरुन ग्रामपंचायतीच्या लेटरहेडवर लिहून घ्या.
- सरपंचांच्या सही सोबत त्यांचे नांव लिहून शिक्का आठवणीने घ्या.

**संपूर्ण अर्जाच्या झेरॉक्स प्रती :**

- संपूर्ण अर्जाच्या ४ झेरॉक्स प्रती काढून ठेवा. एक झेरॉक्स प्रत पडताळणीच्या नोटीस सोबत वन परिक्षेत्र अधिकारी यांना द्यावी लागणार आहे. मूळ प्रत उपविभागीय समितीला द्यावी लागेल. ग्रामसभा, वनहक्क समिती व मदत करणारा कार्यकर्ता यांच्याकडे एक एक झेरॉक्स प्रत ठेवणे आवश्यक आहे.

❖❖❖

भारत सरकार

# जमाती कार्य मंत्रालय


**अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्क मान्य करणे) नियम २००८**
**वन जमिनींच्या सामूहिक हक्कांसाठीच्या दाव्यांचा अर्ज (पहा नियम ११(१) (क) व (४))**

**१. मागणीदाराचे / मागणीदारांचे नाव :**

| अ.क्र. | नांव | अ.ज. | इ.पा. | सही / अंगठा |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |
| ५. | | | | |
| ६. | | | | |
| ७. | | | | |
| ८. | | | | |
| ९. | | | | |
| | आणि .................................... गावातील सर्व मतदार-एकुण संख्या ....................... (बाकी नाव व सह्यांचे स्वतंत्र कागद अर्जास जोडले आहेत.) | | | |

| | | |
|---|---|---|
| १. (क) अनुसूचित जमातीचा समुह (अ.ज.) | होय / नाही | एकुण संख्या ................. |
| १. (ख) इतर पारंपारिक वननिवासींचा समुह (इ.पा.) | होय / नाही | एकुण संख्या ................. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | गांव | | ३. ग्रामपंचायत | |
| ४. | तालुका | | ५. जिल्हा | |



ग्राम............................ ग्रा. पं. .............................. ता. ......................... जि. ..........................

# लाभ घेतलेल्या सामुहिक हक्कांचे स्वरुप

**१) निस्तार यासारखे सामुहिक हक्क, काही असल्यास (पहा अधिनियम कलम ३ (१) (ख))**

| सामुहिक हक्काचे नांव | सर्व्हे/कंपार्टमेंट नं. | क्षेत्र | परिमाण |
|---|---|---|---|
| राजस्व अभिलेखातील ...................... गावाच्या नावे असलेल्या निस्तार पत्रकात नमुद केलेले सर्व निस्तार हक्क<br>किंवा<br>निस्तार यासारखेच जगण्यासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी गावासभोवतालच्या परिसरातून घेण्याचे व वापरण्याचे परंपरागत हक्क | ........................ गावाच्या निस्तार पत्रकात नमुद केलेले सर्व सर्व्हे नंबर व वन नकाशातील सर्व संबंधित कंपार्टमेंट नंबर<br>किंवा<br>पुढील चतु:सीमेच्या क्षेत्राशी संबंधीत सर्व सर्व्हे/कंपार्टमेंट नंबर | एकुण ............................<br>एकर<br>किंवा<br>परंपरागत सामूहिक वापराचे क्षेत्र पुढील चतु:सिमेप्रमाणे<br>पूर्वेस ............................<br>महत्वाच्या खुणा ..............<br>पश्चिमेला ......................<br>महत्वाच्या खुणा ..............<br>दक्षिणेस .........................<br>महत्वाच्या खुणा ..............<br>उत्तरेस ..........................<br>महत्वाच्या खुणा .............. | जितक्या प्रमाणात उपलब्ध आहे व जितके वापरतो तितके. |

**सुचना :** निस्तार पत्रक, नकाशा व वन नकाशा शासनाकडेच असल्यामुळे त्यांच्या प्रती जोडलेल्या नाहीत. क्षेत्राच्या वरील सीमा दर्शविणारा नजरी नकाशा सोबत जोडला आहे.

**२) गौण वनोत्पादनावरील हक्क काही असल्यास (पहा अनिधिनयमाचे कलम ३ (१) (ग))**

| सामुहिक हक्काचे नांव | सर्व्हे/कंपार्टमेंट नं. | क्षेत्र | परिमाण |
|---|---|---|---|
| बांबु, खुरटी, झाडी, खोड, कोसा, मध, मेण, लाख, तेंदुपत्ता, औषधी, वनस्पती, कंदमुळे, आवळा, हिरडा, बेहडा, डिंग, बिबा, चारोळी, मोह, टोळी, लहान खोडे यांच्यासारखी इमारती लाकुड नसलेली वनोत्पादने यांचे स्वामित्व हक्क | .................... गावाच्या निस्तार पत्रकात नमुद केलेले सर्व नर्व्हे नंबर व वन नकाशातील सर्व संबंधित कंपार्टमेंट नंबर<br>किंवा<br>पुढील चतु:सीमेच्या क्षेत्राशी संबंधीत सर्व सर्व्हे/ कंपार्टमेंट नंबर | एकुण ............................<br>एकर<br>किंवा<br>परंपरागत सामूहिक वापराचे क्षेत्र पुढील चतु:सीमेप्रमाणे<br>पूर्वेस (वर प्रमाणे)<br>पश्चिमेला (वर प्रमाणे)<br>दक्षिणेस (वर प्रमाणे)<br>उत्तरेस (वर प्रमाणे) | जितक्या प्रमाणात उपलब्ध आहे, जितके गोळा करतो, वापरतो व जितक्याची विल्हेवाट लावतो तितके. |

**सूचना :** निस्तार पत्रक, नकाशा व वन नकाशा शासनाकडेच असल्यामुळे त्यांच्या प्रती जोडलेल्या नाहीत.

ग्राम. ............................ ग्रा. पं. ........................ ता. ........................ जि. ........................

# लाभ घेतलेल्या सामुहिक हक्कांचे स्वरुप

**३) सामुहिक हक्क**

| **(क) वापर किंवा हक्कदारी असलेले** | **सर्व्हे / कंपार्टमेंट नं.** | **क्षेत्र** | **परिमाण** |
|---|---|---|---|
| जलसंपत्ती–गावहद्दीत व इतर वापरात असलेल्या ठिकाणचे उपलब्ध सर्व पाणी<br>**१) नदी**<br>**२) झरे (पाण्याच्या जागा)**<br>१.<br>२.<br>३.<br>४.<br>५.<br>६.<br>७.<br>८.<br>९.<br>१०.<br>**३) नाले**<br>१.<br>२.<br>३.<br>**४) तलाव**<br>१.<br>२.<br>३.<br>**५) रेती व गाळाची माती**<br>**६) जलचर प्राणी व पाणी**<br>सर्व मासे, खेकडे, शिंपले, घोघ्ले, कासव, शिंगाडे व कसुरमाटी इत्यादी | .............................. गावाच्या निस्तार पत्रकात नमुद केलेले सर्व सर्व्हे नंबर व वन नकाशातील सर्व संबंधित कंपार्टमेंट नंबर<br>किंवा<br>पुढील चतु:सीमेच्या क्षेत्राशी संबंधीत सर्व सर्व्हे / कंपार्टमेंट नंबर | एकूण<br>........................ एकर<br>**नकाशा :**<br>झरे व तलावाची जागा दाखवणारा नकाशा सोबत जोडला आहे.<br>किंवा<br>परंपरागत सामुहिक वापराचे क्षेत्र पुढील चतु:सीमेप्रमाणे –<br>पूर्वेस (वर प्रमाणे)<br>पश्चिमेस (वर प्रमाणे)<br>दक्षिणेस (वर प्रमाणे)<br>उत्तरेस (वर प्रमाणे) | जितक्या प्रमाणात उपलब्ध आहे व जितके वापरतो तितके |

**सूचना :** निस्तार पत्रक, नकाशा व वन नकाशा शासनाकडेच असल्यामुळे त्यांच्या प्रती जोडलेल्या नाहीत.

ग्राम. ........................... ग्रा.पं. ....................... ता. ....................... जि. .......................

## ३) सामुहिक हक्क – मागील पानावरुन पुढे सुरु

| सामुहिक हक्काचे नांव | सर्व्हे/कंपार्टमेंट नंबर | क्षेत्र | परिमाण |
|---|---|---|---|
| (ख) चराई –<br>राजस्व अभिलेखातील ............................ गावाच्या नावे असलेल्या निस्तार पत्रकात नमुद केलेले सर्व चराई हक्क | ............................ गावाच्या निस्तार पत्रकात नमुद केलेले सर्व सर्व्हे नंबर व वन नकाशातील सर्व संबंधित कंपार्टमेंट नंबर<br><br>किंवा<br><br>पुढील चतु:सीमेच्या क्षेत्राशी संबंधीत सर्व सर्व्हे/कंपार्टमेंट नंबर | एकूण<br>.................... एकर<br><br>किंवा<br><br>परंपरागत सामुहिक वापराचे क्षेत्र पुढील चतु:सीमेप्रमाणे –<br>पूर्वेस (वर प्रमाणे)<br>पश्चिमेस (वर प्रमाणे)<br>दक्षिणेस (वर प्रमाणे)<br>उत्तरेस (वर प्रमाणे) | जितक्या प्रमाणात उपलब्ध आहे व जितके वापरतो तितके.<br><br>जनावरांची संख्या:– जितकी आहे तितकी. |

**सूचना :** निस्तार पत्रक, नकाशा व वन नकाशा शासनाकडेच असल्यामुळे त्यांच्या प्रती जोडलेल्या नाहीत.

### (ग) भटके व फिरते यांचेकरिता पारंपारिक संसाधनाची उपलब्धता (अधिनियम ३ (ग) (छ))

| पारंपारिक संसाधनाचे नाव | सर्व्हे/कंपा. नं. | क्षेत्र | परिमाण जितक्या |
|---|---|---|---|
| | | | जितक्या प्रमाणात उपलब्ध आहे व जितके वापरतो तितके |

### (४) आदिम जमाती समूह व कृषक पूर्व समूहांसाठी वसतीस्थान व वस्ती यांची सामूहिक भूधारणा पद्धती (अधिनियम ३(१)(ड))

| सामुहिक भूधारणा पद्धतीचा प्रकार | सर्व्हे/कंपा. नं. | क्षेत्र | परिमाण |
|---|---|---|---|
| | | | जितक्या प्रमाणात उपलब्ध आहे व जितके वापरतो तितके |

ग्राम. ............................ ग्रा.पं. ........................ ता. ........................ जि. ........................

## ५) जैविक विविधता, बौद्धिक संपत्ती व पारंपारिक ज्ञान यांच्यावरील हक्क अधिनियम कलम ३ (१) (ट))

| हक्काचा प्रकार | तपशिल |
|---|---|
| जैविक विविधतेचे संरक्षण, संवर्धन आणि व्यवस्थापन करण्याचा हक्क तसेच बौद्धिक संपत्ती व पारंपारिक ज्ञान यांच्यावरील हक्क | जैव विविधता अधिनियम २००२ मधील कलम ४१ व नियम २००४ मधील नियम २२ मध्ये असलेल्या तरतूदी अनुसार |

## ६) अन्य पारंपारिक हक्क काही असल्यास पहा अधिनियमाचे कलम ३ (१) (झ)

| हक्काचा प्रकार | सर्व्हे/कंपार्टमेंट नं. | क्षेत्र | तपशिल |
|---|---|---|---|
| ६.१ निरंतर वापर करण्यासाठी पारंपारिक वन स्त्रोतांचे संरक्षण, संवर्धन, पुनर्निर्माण व व्यवस्थापन करण्याचा हक्क<br><br>६.२ देवांच्या जागा (पेन्कना जागा)<br><br>१.<br>२.<br>३.<br>४.<br>५.<br>६.<br>७.<br>८.<br>९.<br>१०.<br>११.<br>१२.<br>१३.<br>१४. | निस्तार पत्रकात नमुद सर्व सर्व्हे नंबर वन नकाशा प्रमाणे सर्व संबंधीत कंपार्टमेंट नंबर.<br>किंवा<br>पुढील चतु:सीमेच्या क्षेत्राशी संबंधीत सर्व सर्व्हे/कंपार्टमेंट नंबर | एकूण<br>.................... एकर<br>किंवा<br>परंपरागत सामुहिक वापराचे क्षेत्र पुढील चतु:सीमेप्रमाणे –<br>पूर्वेस (वर प्रमाणे)<br>पश्चिमेस (वर प्रमाणे)<br>दक्षिणेस (वर प्रमाणे)<br>उत्तरेस (वर प्रमाणे) | परंपरेनुसार गाव समाजच या सामुहिक वन स्त्रोतांचे संरक्षण, संवर्धन व व्यवस्थापन करीत होता. वसाहत काळात व स्वातंत्र्यानंतरही हक्क अमान्य केल्याने अनुसूचित जमाती व अन्य पारंपारिक वन निवासींवर ऐतिहासिक अन्याय झाला आहे. तो हक्क मान्य करुन न्याय देणे आवश्यक आहे. |

ग्राम. ......................... ग्रा.पं. ...................... ता. ...................... जि. ......................

## ७) पृष्ट्यर्थ पुरावा (पहा नियमाचे कलम – १३)

| हक्काचा प्रकार | पुरावे |
|---|---|
| १. निस्तार हक्क/निस्तार सारखे हक्क | १. निस्तार पत्रक / चतु:सीमा व नजरी नकाशा |
| २. गौण वनउत्पादन हक्क | २. राजस्व नकाशा |
| ३. सामुहिक हक्क | ३. वन नकाशा |
| ३.१ (क) वापर किंवा हक्कदारी असलेले जलसंपत्तीचे हक्क | ४. बंदोबस्त मिसल सन (२३–२४) |
| ४. जैविक विविधता, बौद्धिक संपत्ती व पारंपारिक ज्ञान यांच्यावरील हक्क | ५. प्रत्यक्ष जमिनीवरील पुरावा |
| ५. अन्य पारंपारिक हक्क | ६. जैविक विविधता अधिनियम २००२ कलम ४१ |
| ५.१ निरंतर वापर करण्यासाठी पारंपारीक वन स्त्रोतांचे संरक्षण, संवर्धन, पुनर्निर्माण व व्यवस्थापन करण्याचा हक्क | ७. जैविक विविधता नियम २००४ चे कलम २२ |
| ५.२ देवांच्या जागा | ८. महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एस.३०/२०००/प्रक्र २१५/फ–६ दि. १०.११.२००० अन्वये निस्तार धोरणाचा आढावा घेण्यासाठी गठीत समितीचा अहवाल |
| | ९. परिस्थितीजन्य पुरावा |
| | १०. मागणीदारा खेरीज अन्य वडीलधाऱ्या माणसांचे लेखानिविष्ट कथन |
| | ११. |
| | १२. |
| | १३. |

## ८. कोणतीही अन्य माहिती

८.१ वर पुरावे म्हणून नमुद केलेल्या क्र. १,२,३,४,६,७,८ च्या पुराव्यांचे मुळ अभिलेख व दस्ताऐवज शासनाकडे असल्यामुळे त्यांच्या सत्य प्रतिलीपी सोबत जोडलेल्या नाहीत.

८.२ मागणीदार अनुसूचित जमातीचे किंवा इतर पारंपारिक वननिवासी असून ते उपजिविकेच्या गरजांसाठी वन किंवा वनजमिनीवर अवलंबून असल्याबाबतचे सरपंच, ग्रा.पं. ................ चे प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.

८.३ नियम ६ व (४) अनुसार उपविभागीय समितीने ग्रामसभेला किंवा वनहक्क समितीला आवश्यक असलेली संपूर्ण माहिती अजुन पुरविलेली नाही.

ग्राम ......................... ग्रा.पं. ............................., ता. ...................... जि. .................... चा वन जमिनींच्या सामुहिक हक्कांसाठीच्या दाव्यांचा अर्ज, एकूण पाने .............. दिनांक / / रोजी प्राप्त झाला.

सही :

नाव :

(शिक्का)

पद :

ग्राम. ........................... ग्रा. पं. ....................... ता. ....................... जि. .....................


## वन जमिनींच्या सामुहिक हक्कांसाठीच्या दाव्यांचा अर्ज

**(पहा नियम ११(१) (क) व (४))**

**पान क्र. १ वरुन पुढे चालु ............**

**१. मागणीदाराचे/मागणीदारांचे नाव :- ग्रामसभा - ग्रा. पं. ता. जि.**

| अ.क्र. | नांव | अ.ज. | इ.पा. | सही/आंगठा |
|---|---|---|---|---|
| १० | | | | |
| ११ | | | | |
| १२ | | | | |
| १३ | | | | |
| १४ | | | | |
| १५ | | | | |
| १६ | | | | |
| १७ | | | | |
| १८ | | | | |
| १९ | | | | |
| २० | | | | |
| २१ | | | | |
| २२ | | | | |
| २३ | | | | |
| २४ | | | | |
| २५ | | | | |
| २६ | | | | |
| २७ | | | | |
| २८ | | | | |
| २९ | | | | |
| ३० | | | | |



| अ.क्र. | नांव | अ.ज. | इ.पा. | सही/आंगठा |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |



# वनहक्क जमिनींच्या सामुहिक हक्कांसाठीच्या दाव्यांचा अर्ज

**(पहा नियम ११ (१) (क) (४))**

**चतु:सीमा व नदी, नाले, झरे, तलाव व देवांच्या जागा दाखविणारा कच्चा नकाशा**

**उत्तर दिशा** ↑

**तपशिल :**

| | | |
|---|---|---|
| १) | २) | ३) |
| ४) | ५) | ६) |
| ७) | ८) | ९) |
| १०) | ११) | १२) |
| १३) | १४) | १५) |
| १६) | १७) | १८) |

# पडताळणी व ग्रामसभेच्या नोटीस संबंधी सूचना

- पडताळणीच्या नोटीसच्या नमुन्यात (पहा पान क्र. २४) सर्व रिकाम्या जागा भरा. पडताळणीची नोटीस वनहक्क समितीच्या वनहक्क समितीच्या सचिवाच्या सहीने काढायची आहे.
- किमान सात दिवस आधी सर्वांना नोटीस मिळेल याची काळजी घ्या.
- पडताळणीची वेळ शक्यतो सकाळी ८ ची ठेवा. त्याच दिवशी दोन तासाने १० वाजता ग्रामसभा ठेवल्यास गावकरी व शासकीय कर्मचारी दोघांचीही सोईचे होवू शकते.
- ग्रामसभेची नोटीस (पहा पान क्र. २८) सचिव ग्रामसभा तथा ग्रामसेवकाच्या सहीने काढायचा आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीत नियम ११ (६) अनुसार ग्राम पंचायतीचा सचिव-ग्रामसेवक हाच एका गावाच्या ग्रामसभेचा सचिव म्हणूनही काम पाहील.
- वनपरिक्षेत्र अधिकारी यांना दाव्याची झेरॉक्स प्रत नोटीस सोबत देणे आवश्यक आहे. त्यांचे कार्यालयातील आवक-जावक कारकुनाकडे नोटीस व दाव्याची प्रत देवून नोटीसच्या झेरॉक्स प्रतीवर कारकुनाची सही, शिक्का व तारीख घ्यावी व हा कागद फाईलमध्ये सांभाळुन ठेवावा.
- मा. तहसिलदार व मा. तालुका निरिक्षक भूमि अभिलेख यांचे कार्यालयातही आवक-जावक कारकुनाकडे नोटीस देवून नोटीसच्या झेरॉक्स प्रतीवर कारकुनाची सही, शिक्का व तारीख घ्यावी व हा कागद फाईलमध्ये सांभाळून ठेवावा.

# पडताळणी व ग्रामसभेच्या अहवाला संबंधी सूचना

- पडताळणी व ग्रामसभेच्या अहवालाच्या नमुना प्रतीच्या (पान क्र. २५ ते २७ व २९ ते ३१) प्रत्येकी दोन प्रती आधीच झेरॉक्स करुन ठेवाव्यात. माहिती भरताना दोन्ही प्रतींमध्ये भरावी. सह्या घेतांनासुद्धा दोन्ही प्रतींवर घ्याव्यात.
- ''वनहक्क समितीचा पडताळणी निष्कर्ष - सामुदायीक दाव्यांच्या संबंधी शिफारस'' या नमुन्यामध्ये अर्ज दावा क्र. वन हक्क समितीच्या नोंद-वहीमध्ये जसा आहे तसाच लिहावा. नांव, गाव, ग्रामपंचायत, तालुका, क्षेत्र इत्यादी सर्व माहिती दावा फार्ममध्ये जशी आहे तशीच भरावी.
- पडताळणीच्या वेळेला उपस्थित सर्वांची नांवे पदासह एका रजिस्टरमध्ये लिहून सह्या घ्याव्यात.
- क्र. ४ (१) (i) मध्ये उपस्थित वनहक्क समिती सदस्यांपैकी प्रमुख ५ सदस्यांची नांवे लिहून सह्या घ्याव्यात.
- क्र. ४ (१) (ii) मध्ये उपस्थित मागणीदार प्रतिनिधींपैकी प्रमुख ५ प्रतिनिधींची नांवे लिहून सह्या घ्याव्यात.
- क्र. ४ (१) (iii) मध्ये उपस्थित वन अधिकारी व स्वयंसेवी संस्थेच्या कार्यकर्त्यांसह अन्य अधिकारी यांचीही पदासह नावे लिहून सह्या घ्याव्यात.
- क्र. ४ (३) (iii) दावापत्रात लिहील्याप्रमाणे तपशील लिहावा.

- क्र. ५ मध्ये सहपत्रांची एकूण पाने किती आहेत ते मोजून लिहावे.
- पडताळणीचा अहवाल ग्रामसभेचा सचिव ग्रामसेवक याला देवून तो प्राप्त झाल्याची पोच पावती सही, शिक्का व तारखेसह घ्यावी.
- ग्रामसभा सुरु होताच उपस्थितांपैकी योग्य व्यक्तिची सर्व सहमतीने त्या ग्रामसभेचा अध्यक्ष म्हणून निवड करावी.
- सामुहिक वन हक्क दाव्यांच्या संदर्भात आयोजित ग्रामसभेच्या अहवालाकरीता जो नमुना आहे तो क्रमवार वाचून त्याप्रमाणे कार्यवाही करावी. सर्व रिकाम्या जागा योग्यप्रकारे भराव्यात. सर्व ठराव नोंदवहीतही सोबतच लिहून घ्यावे.
- अहवालाच्या दोन्ही प्रतींवर संबंधित सर्व दस्ताऐवजांची एकूण पाने किती ते लिहून अध्यक्ष व सचिवांच्या सह्या घ्याव्या. सचिवाचा शिक्का घेण्यास विसरु नये.

## दावा उपविभाग स्तरीय समितीकडे दाखल करणे व त्यापुढील कार्यवाही

- ग्रामपंचायतीच्या लेटरहेडवर नमुन्याप्रमाणे कव्हरींग लेटर (पहा पान क्र. ३२) तयार करुन सचिव ग्रामसेवकाच्या सहीने मा. अध्यक्ष, उपविभागस्तरीय समिती तथा उपविभागीय अधिकारी यांना दावा पडताळणी व ग्रामसभेच्या अहवालासह सादर करावा. उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयातील आवक-जावक कारकुनाकडे देवून सही, शिक्का व तारीख घ्यावी. उपविभागीय कार्यालय दूर असल्यास मार्फत मा. तहसिलदार असे लिहून तहसिल कार्यालयातील आवक-जावक कारकुनाकडे देवून सही, शिक्का व तारीख घ्यावी. पोचपावतीचा हा कागद जपून ठेवावा.
- सात दिवसात काही लेखी उत्तर न आल्यास स्मरणपत्र (पहा पान क्र. ३३) द्यावे. त्यानंतर सात दिवसांत कार्यवाही न झाल्यास माहितीच्या अधिकारा अंतर्गत दाव्यावर काय कार्यवाही सुरु आहे किंवा झाली आहे याची नोटशीटवरील नोंदींसह माहिती मागावी. (पहा पान क्र. ३४).

❖❖❖

ग्राम. ............................ ग्रा.पं. ........................ ता. ........................ जि. ......................

# नियम १२ (१) अन्वये वनहक्क पडताळणीसाठी सूचना

दिनांक :

प्रति,

........................... गावाचे सर्व ग्रामस्थ,

मु. ....................., ता. ...................,

जि. ....................

**विषय : सामुहिक हक्क मागणीची प्रत्यक्ष पडताळणी**

आपणास कळविण्यात येते आहे की, आपण वन जमीन व वन साधन संपत्तीच्या उपभोगाच्या हक्कासाठी जो दावा केलेला आहे, त्याचे स्वरुप तसेच तेथे उपलब्ध असलेले पुरावे यांच्या प्रत्यक्ष पडताळणीसाठी वन हक्क समितीद्वारे .............वार, दिनांक ................... रोजी ठिक सकाळी ........................ वाजता ................................ या ठिकाणी बैठक आयोजित केली आहे. आवश्यक वाटल्यास आपण पडताळणीच्या वेळेस त्या ठिकाणी उपस्थित राहू शकता आणि त्यावेळी काही आणखी पुरावा किंवा कागदपत्रे देऊ इच्छित असाल तर ती सादर करु शकता.

| | |
|---|---|
| दिनांक : | वार : |
| वेळ : | |
| स्थळ : | |

सही

श्री ............................

सचिव

वनहक्क समिती ...........................

**प्रतिलिपी :**

१) मा. तहसिलदार, तालुका .......................................

२) मा. वनपरिक्षेत्र अधिकारी, ......................................
(सोबत दाव्याच्या अर्जाची संपूर्ण प्रत जोडली आहे.)

३) मा. तालुका निरीक्षक भुमी अभिलेख, ........................
यांना पडताळणीच्या ठिकाणी उपस्थित राहून समितीस सहकार्य करण्यासाठी.

# अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८

**(वन हक्क समितीचा पडताळणी निष्कर्ष – सामुदायिक दाव्याच्या संबंधी शिफारस)**

**(नियम ११ (२) (पाच) चे अधिनस्त ग्रामसभेच्या समोर सादर)**

अर्ज दावा क्र. .....................

मागणीदारांचे, समुदायाचे नाव :

नांव : .................................................. व इतर एकुण ............. (यादी दाव्यासोबत जोडली आहे.)

गांव : .................................................. ग्रामपंचायत : ..........................................................


तालुका : .............................................. जिल्हा : ................................................................

**१. दाव्याचे स्वरुप :**

| हक्काचा प्रकार | कंपार्टमेंट/सर्व्हे नं. | क्षेत्र | परिमाण |
|---|---|---|---|
| ❖ निस्तार सारखे हक्क ३(१)(ख)<br>❖ गौण वनोत्पादनावरील हक्क ३(१)(ग)<br>❖ जलसंपत्ती<br>❖ चराई (गुरांच्या संख्येसह)<br>❖ जैविक विविधता, बौद्धिक संपत्ती व पारंपारिक ज्ञान<br>❖ अन्य पारंपारिक हक्क, सामुहिक वनस्त्रोताचे व्यवस्थापन करण्याचा हक्क ३(१)(झ) | .................<br>गावाचे निस्तार पत्रकात नमुद सर्व सर्व्हे नं. व वन नकाशा प्रमाणे सर्व संबंधीत कंपार्टमेंट नंबर | ...................<br>एकर<br>हेक्टर | जितक्या प्रमाणात उपलब्ध आहे, जितके वापरतो व जितक्याची विल्हेवाट लावतो तितके<br>गुरांची संख्या : जितकी आहे तितकी |
| ❖ भटके व फिरते ...<br>❖ आदिम जमाती ... | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

**२. दाव्यांच्या समर्थनार्थ सादर केलेला पुरावा, साक्ष :**

| हक्काचा प्रकार | पुरावे |
|---|---|
| १. निस्तार हक्क<br>२. गौण वनोत्पादनावरील स्वामित्व हक्क<br>३. सामुहिक हक्क<br>३.१(क) वापर किंवा हक्कदारी असलेले जलसंपत्तीचे हक्क<br>३.२(ख) चराईचे हक्क<br>४. जैविक विविधता, बौद्धिक संपत्ती व पारंपारिक ज्ञान यांच्यावरील हक्क<br>५. अन्य पारंपारिक हक्क<br>५.१ निरंतर वापर करण्यासाठी पारंपारिक वनस्त्रोतांचे संरक्षण, संवर्धन, पुनर्निर्माण व व्यवस्थापन करण्याचा हक्क<br>५.२ देवांच्या जागा | १. निस्तार पत्रक<br>२. राजस्व नकाशा<br>३. वन नकाशा<br>४. बंदोबस्त मिसल सन (२२-२४)<br>५. जैविक विविधता अधिनियम २००२<br>६. जैविक विविधता नियम २००४<br>७. महाराष्ट्र शा.नि.क्र. एस ३०-२०००-प्रक्र २१५/ फ-६ दि. १०.११.२००० अन्वये निस्तार धोरणाचा आढावा घेण्यासाठी गठीत सहारिया समितीचा अहवाल<br>८. प्रत्यक्ष जमिनीवरील पुरावा<br>९.<br>१०. |



## ३. दावा अर्जामध्ये सादर निवेदनाच्या संदर्भात मागणीदारांच्या पात्रतेबाबत निष्कर्ष :

| | | | |
|---|---|---|---|
| **(अ) (ब)** | | **अनुसूचित जमातीच्या व इतर पारंपारिक वन निवासी मागणीदारांसाठी** | |
| (१) | (i) | ''प्राथमिक स्वरुपात वन निवासी'' असल्यासंबंधी पुरावा उपलब्ध आहे काय ?<br>तपशिल : सरपंचाचे प्रमाणपत्र जोडले आहे. | – होय |
| | (ii) | उपरोक्त पुराव्याबाबत वनहक्क समिती (व.ह.स.) चे समाधान झाले आहे काय ?<br>तपशिल : सरपंचाचे प्रमाणपत्र जोडले आहे. | – होय |
| (२) | (i) | अनु. जमातीचा किंवा इतर पा. वन निवासी असल्याबाबत पुरावा जोडला आहे काय ? | – होय |
| | (ii) | उपरोक्त पुराव्याबाबत वनहक्क समिती (व.ह.स.) चे समाधान झाले आहे काय ? | – होय |
| (३) | (i) | मागणीदार समुदाय नियम २ (ब) प्रमाणे उपजिवीकेच्या वास्तविक गरजासाठी वन व वनजमिनीवर अवलंबून आहे काय ? | – होय |
| | | तपशिल : सरपंचाचे प्रमाणपत्र जोडले आहे. | |
| | (ii) | उपरोक्त पुराव्याबाबत वन हक्क समिती (व.ह.स.) चे समाधान झाले आहे काय ?<br>तपशिल : सरपंचाचे प्रमाणपत्र जोडले आहे. | – होय |
| **पात्रतेबद्दल निष्कर्ष :** | | ***उपरोक्त माहिती लक्षात घेता मागणीदार – समुदाय या अधिनियमाखाली सामुदायीक वन हक्क प्राप्त करण्यासाठी पात्र आहे.*** | |

## ४. मागणीदाराच्या सामुदायिक वन हक्काबाबत पडताळणी :

**(अ) पुराव्याच्या आधारावर :**

तपशिल : सर्व सामुहिक वन हक्क कलम ३(१) मधील तरतुदी प्रमाणेच केलेले असून दोन किंवा त्यापेक्षा जास्त पुरावे दिलेले आहेत.

**(ब) प्रत्यक्ष ठिकाणी पाहणीच्या आधारावर : (पाहणी दि. / / )**

| | | |
|---|---|---|
| (१) | (i) उपस्थित वन हक्क समिती सदस्यांची नांवे : | सही |
| | १. | |
| | २. | |
| | ३. | |
| | ४. | |
| | ५. | |
| (१) | (ii) उपस्थित मागणीदार प्रतिनिधींची नांवे : | सही |
| | १. | |
| | २. | |
| | ३. | |
| | ४. | |
| | ५. | |
| (१) | (iii) उपस्थित वन अधिकारी, इतर अधिकारी व स्वयंसेवी संस्थेच्या सदस्यांची नांवे : | सही |
| | १. | |
| | २. | |
| | ३. | |
| | ४. | |
| | ५. | |

| | | |
|---|---|---|
| (२) | (i) | समर्थनार्थ किंवा आक्षेपाकरिता सादर केलेल्या दस्तऐवजाचे (असल्यास) विवरण<br>विवरण :कोणतेही अतिरिक्त दस्तऐवज सादर केले नाहीत. |
| | (ii) | समर्थनार्थ किंवा आक्षेपाकरिता सादर केलेल्या दस्तऐवजावर व.ह.स. चा पडताळणी निष्कर्ष :<br>पडताळणी निष्कर्ष : दाव्यासोबत सादर केलेले पुरावे योग्य आहेत. |
| (३) | (i) | मोजणी :<br>तपशिल :निस्तार पत्रक व नकाशा प्रमाणेच दावा असल्यामुळे मोजणीची आवश्यकता नाही. |
| | (ii) | जमिनीवर उपलब्ध भौतिक साक्ष याचा तपशिल द्यावा.<br>तपशिल : निस्तार पत्रक व नकाशा प्रमाणे सीमांकन खुणा आहेत. |
| | (iii) | जमिनीच्या सीमा – हद्दीच्या खुणा (तपशिल द्यावा.)<br>तपशिल : उत्तरेला –<br>दक्षिणेला –<br>पूर्वेला –<br>पश्चिमेला – |
| (४) | | मागणीदाराचे – समुदायाचे काही इतर वन जमिनीवर या दाव्यातील हक्काचे–मिळकतीचे स्त्रोत आहे काय ? – नाही |
| (५) | | मागणीदाराचे – समुदायाचे काही इतर गावातील वन जमिनीवर या दाव्यातील हक्काचे – मिळकतीचे स्त्रोत आहे काय ? – नाही |

| ५. | **दाव्या संदर्भात वन हक्क समितीचा निष्कर्ष :** |
|---|---|
| | खालील कारणामुळे सामुदायिक हक्काचा दावा पुर्णत: मान्य करण्यायोग्य आहे.<br>१) केलेला दावा योग्य आहे.<br>२) दिलेले पुरावे योग्य आहेत. |

सहपत्र : एकूण १ ते ........... पाने


दि. / /

अध्यक्ष
वन हक्क समिती

सचिव
वन हक्क समिती

गाव ................, ग्रा. पं. ..................., ता. ......................, जि. .......................

(शिक्का)



# ग्रामसभेची सूचना

**(वन हक्क समितीच्या निष्कर्षावर विचार करण्यासाठी)**

दिनांक :

जिल्हा ................................, तालुका ................................, यांच्या ग्रामपंचायत ................................ अंतर्गत गाव ................................ यांची ग्रामसभा ही पुढे दिलेल्या दाव्यांच्या संदर्भात दिनांक ................................ रोजी .............. वाजता (मध्यान्हपूर्व/मन्यान्होत्तर) ठेवण्यात आलेली आहे. ग्रामसभेच्या बैठकीत वनहक्क समितीच्या निष्कर्षावर विचारविनिमय करुन योग्य ठराव पारित करण्यात येणार आहे. मागणीदार / सर्व हितसंबंधी पक्षकार उपस्थित राहू शकतात व आपल्या बाजुचे पुरावे / कागदपत्रे सादर करु शकतात.

| मागणीदाराचे नांव / मागणीदारांची नांवे | बीटचे नांव/कंपार्टमेंट नं./क्षेत्र |
|---|---|
| (एकर/हेक्टर) | |

१. ................................ गावाचे सर्व ग्रामस्थ

२. ................................ व इतर ग्रामस्थ

**आवश्यक हितसंबंधी / पक्षकार**

१. मा. तहसिलदार ........................................................

२. मा. संवर्ग विकास अधिकारी .......................................

३. मा. वनपरीक्षेत्र अधिकारी ............................................

४. मा. तालुका निरीक्षक भुमी अभिलेख ............................

५. ग्रामपंचायत नोटीस बोर्ड, प्रसिद्धीस रवाना

**नांव व सही**

**सचिव, ग्रामसभा**

# अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८

**ग्रामसभेचे ठराव ''सामुहिक वन हक्काबाबत'' दावा क्रमांक ..................**

**''सामुहिक वन हक्क'' दाव्यांच्या संदर्भात आयोजित ग्रामसभा**

आज दि. ............... रोजी अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६ व २००८ अन्वये स्थापित वन हक्क समिती गाव .................. च्या अहवालाच्या संदर्भात अंतर्गत गाव ............. ता. ............... जि. ............. या ठिकाणी ''सामुहिक वन हक्क'' यांच्या दाव्या संदर्भात केलेल्या शिफारशीवर ग्रामसभेचा ठराव मंजुर करण्यासाठी सभा आयोजित करण्यात आली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज पार पाडण्यात आले.

१. सर्वप्रथम ग्रामसभेसाठी आवश्यक असलेल्या गणपूर्तीबाबत (कोरमबाबत) खात्री करण्यात आली. ग्रामसभेमध्ये एकुण ........... ग्रामस्थ असून आज या सभेत ........... संख्येत ग्रामस्थ उपस्थित असल्यामुळे आवश्यक असलेली गणपूर्ती (कोरम) पुर्ण झाली आहे.

२. वन हक्क समितीने प्रस्तुत केलेले एकुण १ इतके दावे ग्रामसभेच्या समोर ठरावासाठी ठेवण्यात आले.

३. वरील एकूण १ दाव्याच्या संदर्भात ग्रामसभेला ठरावासाठी सहाय्यभूत ठरेल म्हणून सर्वप्रथम वन हक्क समितीचे सचिव .................................... यांनी सभेच्या सुरुवातीस ''अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६ व २००८'' यातील सर्व संबंधित तरतुदी सर्व उपस्थितांना व्यवस्थीतरित्या समजावून सांगितल्या.

४. वन हक्क समितीने सादर केलेल्या ''सामुहिक वन हक्क'' च्या दाव्याच्या पडताळणीसंबंधी उपरोक्त नियमातील कलम ११(२)(पाच) मधील तरतुदीप्रमाणे सादर केलेल्या प्रकरणाची, त्यामधील दस्तऐवजाची टप्याटप्याने तपासणी करुन त्यासंबंधात सर्व संबंधितांचे म्हणणे ऐकून घेऊन आणि त्यांनी दिलेले निवेदन इ. विचारात घेऊन केलेली कार्यवाही व पारित केलेले ठराव खालीलप्रमाणे :

i) अर्ज दावा क्रमांक १ ठराव क्रमांक .............................................................

ii) मागणीदारांचे – समुदायाचे नांव ................................ व इतर .................... सर्व ग्रामस्थ, ग्रामसभा ........................ ग्रा.पं. ................... ता. ................. जि. ...........................

iii) **दाव्याचे स्वरुप**

| **हक्काचा प्रकार** | **कम्पार्टमेंट/सर्व्हे. नं.** | **क्षेत्र** | **परिमाण** |
|---|---|---|---|
| ❖ निस्तार सारखे हक्क ३(१)(ख)<br>❖ गौण वनोत्पादनावरील हक्क ३(१)(ग)<br>❖ जलसंपत्ती<br>❖ चराई (गुरांच्या संख्येसह)<br>❖ जैविक विविधता, बौद्धिक संपत्ती व पारंपारिक ज्ञान<br>❖ अन्य पारंपारिक हक्क, सामुहिक वनस्त्रोताचे व्यवस्थापन करण्याचा हक्क ३(१)(झ) | ....................<br>गावाचे निस्तार पत्रकात नमुद सर्व सर्व्हे नं. व वन नकाशा प्रमाणे सर्व संबंधित कम्पार्टमेंट नंबर | ................<br>एकर<br>................<br>हेक्टर | जितक्या प्रमाणात उपलब्ध आहे, जितके वापरतो व जितक्याची विल्हेवाट लावतो तितके.<br>गुरांची संख्या : जितकी आहे तितकी. |
| ❖ भटके व फिरते ...<br>❖ आदिम जमाती ... | लागू नाही | लागु नाही | लागू नाही |

**(iv) मागणीदार – समुदायाने दावा अर्जाच्या पृष्ठ्यर्थ खालील पुरावे – साक्ष सादर केले आहे.**

| | हक्काचा प्रकार | पुरावे |
|---|---|---|
| १. | निस्तार हक्क | १. निस्तार पत्रक |
| २. | गौण वनोत्पादनावरील स्वामित्व हक्क | २. राजस्व नकाशा |
| ३. | सामुहिक हक्क | ३. वन नकाशा |
| | ३.१ (क) वापर किंवा हक्कदारी असलेले जलसंपत्तीचे हक्क | ४. बंदोबस्त मिसल सन (२२-२४) |
| | ३.२ (ख) चराईचे हक्क | ५. जैविक विविधता अधिनियम २००२ |
| ४. | जैविक विविधता, बौद्धिक संपत्ती व पारंपारिक ज्ञान यांच्यावरील हक्क | ६. जैविक विविधता नियम २००४ |
| | | ७. महाराष्ट्र शा.नि.क्र. एस ३०-२०००-प्रक्र २१५/फ-६ दि. १०.११.२००० अन्वये निस्तार धोरणाचा आढावा सहारिया समितीचा अहवाल |
| ५. | अन्य पारंपारिक हक्क | |
| | ५.१ निरंतर वापर करण्यासाठी पारंपारिक वन स्त्रोतांचे संरक्षण, संवर्धन, पुनर्निर्माण व व्यवस्थापन करण्याचा हक्क | |
| | ५.२ देवांच्या जागा | ८. प्रत्यक्ष जमिनीवरील पुरावा |

**(v) खुले वाचन व सखोल तपासणी :**

**(१) मागणीदारांच्या – समुदायाच्या पात्रतेबाबत :**

दावा अर्जान्वये मागणीदाराने त्याच्या पात्रतेबाबत वन हक्क समितीला दिलेले पुरावे, त्या संदर्भात दस्तऐवज व मागणीदारांच्या अर्जाच्या अनुषंगाने वन हक्क समितीचे अहवालाचे मुद्दा क्रमांक (अनुसूचित जमातीसाठी ३(अ)(१), (२), (३) (इतर पारंपारिक वन निवासी मागणीदारांसाठी ३(ब),(१),(२),(३)) चे ग्रामसभेसमोर खुले वाचन झाले व वन हक्क समितीचे अहवालाचे व निष्कर्षाची ग्रामसभेने चर्चा व सखोल तपासणी केली.

ग्रामसभेमध्ये प्रत्येक मुद्यांबाबत सविस्तर खुली चर्चा झाली असून ग्रामसभेने खालीलप्रमाणे ठराव मंजुर केले आहेत.

## ग्रामसभेचा ठराव

वरील मागणीदारांच्या-समुदायांच्या पात्रतेबाबत वन हक्क समितीचे अहवालातील तपशिल वन हक्क प्राप्त करण्यासाठी पात्रता – अपात्रताबाबत निष्कर्ष तसेच हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्तीचे म्हणणे – आक्षेप ऐकून घेऊन आणि त्यांनी दिलेले निवेदन इ. विचारात घेता ग्रामसभेने असे ठराव पारित केले आहेत की,

मागणीदारांच्या – समुदायांच्या पात्रतेबाबत वन हक्क समितीने काढलेल्या निष्कर्षाशी ग्रामसभा खालील कारणास्तव पूर्णपणे सहमत आहे आणि मागणीदार – समुदाय उपरोक्त अधिनियमाखाली ''सामुहिक वन हक्क'' प्राप्त करण्यास पात्र आहेत.

(एक) सरपंचांनी दिलेल्या प्रमाणपत्राचे ग्रामसभेत जाहीर वाचन करण्यात आले. त्याला सर्वांनी संमती दिली.

(दोन) पडताळणीचा अहवालही ग्रामसभेत वाचण्यात आला. त्यालाही सर्वांनी मंजुरी दिली.

**२. पात्र मागणीदारांचे – समुदायांचे वन हक्काबाबत :**

वरील बाबींच्या संदर्भात ग्रामसभेने खालीलप्रमाणे पडताळणी केली.

(१) वन हक्क समितीच्या अहवालातील मुद्दा क्रमांक ४(अ) अन्वये वन हक्क समितीने दिलेले तपशिल व प्रत्येक पुराव्याबाबत वनहक्क समितीचे समाधान – असमाधान बाबत ग्रामसभेसमोर खुले वाचन झाले व वन हक्क समितीचे अहवालाचे व निष्कर्षाची ग्रामसभेने चर्चा व सखोल तपासणी केली.

(२) वन हक्क समितीच्या अहवालातील मुद्दा क्रमांक ४ (ब)(१) मधील नमूद तपशिल :

४(ब)(२) मधील नमूद विवरण व त्याखाली नमूद वन हक्क समितीचे पडताळणी निष्कर्ष.

४(ब)(३) मधील नमूद मोजणीचा तपशिल, ४(ब)(ब) मधील नमूद इतर जमिनी व मिळकतीचे स्त्रोतांबाबतचा तपशिल व ४(ब)(५) मधील इतर गावातील वन जमिनीवरचा तपशिल यांचे ग्रामसभेसमोर खुले वाचन.

ग्रामसभेमध्ये प्रत्येक मुद्यांबाबत सविस्तर चर्चा झाली असून ग्रामसभेने खालीलप्रमाणे ठराव मंजुर केले आहेत.

**ग्रामसभेचा ठराव :**

मागणीदारांना-समुदायाला उपरोक्त अधिनियमाखाली नमुद केल्यानुसार ''वन हक्क'' देय आहे. हा ठराव मंजुर करण्यात येवून उपविभागीय समितीकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावे.

## देय वन हक्काचा तपशिल :

| हक्काचा प्रकार | कम्पा./सर्व्हे नं. | क्षेत्र | परिमाण |
|---|---|---|---|
| ❖ निस्तार सारखे हक्क ३(१)(ख)<br>❖ गौण वनोत्पादनावरील हक्क ३(१)(ग)<br>❖ जलसंपत्ती<br>❖ चराई (गुरांच्या संख्येसह)<br>❖ जैविक विविधता, बौद्धिक संपत्ती व पारंपारिक ज्ञान<br>❖ अन्य पारंपारिक हक्क, सामुहिक वनस्त्रोताचे व्यवस्थापन करण्याचा हक्क ३(१)(झ) | ..................<br>गावाचे निस्तार पत्रकात नमुद सर्व सर्व्हे नंबर व वन नकाशा प्रमाणे सर्व संबंधीत कम्पार्टमेंट नंबर | ............<br>एकर<br>...........<br>हेक्टर | जितक्या प्रमाणात उपलब्ध आहे, जितके वापरतो व जितक्याची विल्हेवाट लावतो तितके गुरांची संख्या : जितकी आहे तितकी |
| ❖ भटके व फिरते<br>❖ आदिम जमाती | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

**आवश्यक समर्थन : दावा व पुरावे योग्य असल्यामुळे**

वरील प्रमाणे हितसंबंध असलेले सर्व व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर तद्गतच त्यासंबंधी सर्व दस्ताऐवजाची पाहणी केल्यानंतर पात्रतेबाबत काढलेले निष्कर्ष तसेच मागणीदारांच्या-समुदायांच्या वन हक्काबाबत निष्कर्षानुसार ग्रामसभेने ठराव संमत केलेले असून ते पुढील कार्यवाहीसाठी उपविभागीय समितीकडे पाठविण्यात यावेत, असे सर्वानुमते ठरले. ठराव एकमताने मंजुर करण्यात आला.

सहपत्र : संबंधित सर्व दस्ताऐवज एकूण पाने .................

सही -

सचिव अध्यक्ष

नांव -

(शिक्का)

ग्रामसभा .................................

दिनांक : / /

# उपविभागीय समितीला सामुहिक वन हक्क दावा सादर करतांना जोडावयाच्या कव्हरींग लेटरचा नमुना

**(हे पत्र ग्रामपंचायतच्या लेटरहेडवर तयार करावे)**

---

**कार्यालय**

**ग्रामपंचायत** ....................................

पंचायत समिती ..................., जि. ......................

पत्र क्र. :

दिनांक :

प्रति,

मा. अध्यक्ष,
उपविभाग स्तरिय समिती तथा
उपविभागीय अधिकारी,
.........................................
जि. .................................

**विषय : वन जमिनीच्या सामुहिक हक्कासाठीच्या दाव्यांचा अर्ज**

महोदय,

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम २००६ व नियम २००८ अंतर्गत गाव .........................., ग्रामपंचायत .........................., तालुका .........................., जि. .......................... चा वन जमिनींच्या सामुहिक हक्कांसाठीच्या दाव्याचा अर्ज नियमाप्रमाणे आपल्याकडे सादर करीत आहोत. सोबत खालील कागदपत्रे, एकुण पाने संख्या ......................... जोडली आहेत.

१. ग्रामसभेचा अहवाल – मुळ प्रत
२. ग्रामसभेची नोटीस – झेरॉक्स प्रत
३. पडताळणी अहवाल – झेरॉक्स प्रत
४. पडताळणीची नोटीस – झेरॉक्स प्रत
५. वन जमिनीच्या सामूहिक हक्कासाठीच्या दाव्यांचा अर्ज – मुळ प्रत
६. सामुहिक जलसंपत्ती व देवांच्या जागा दाखविणारा कच्चा नकाशा – झेरॉक्स प्रत
७. सरपंचांचे प्रमाणपत्र – मुळ प्रत

पुढील सुयोग्य कार्यवाहीसाठी सादर.

आपला/ली नम्र

सही :

नाव :

सचिव :

ग्रामपंचायत : .............................

शिक्का

# उपविभागीय अधिकाऱ्यांना द्यावयाच्या स्मरणपत्राचा नमुना

**(हे पत्र ग्रामसभेच्या लेटरहेडवर तयार करावे)**

**कार्यालय**

**ग्रामसभा** ....................................

ग्रामपंचायत ...................., ता. ...................., जि. .......................

पत्र क्र. :

दिनांक :

प्रति,

मा. अध्यक्ष,
उपविभाग स्तरिय समिती तथा
उपविभागीय अधिकारी,
........................................
जि. .................................

**विषय : सामुहिक हक्काच्या दाव्यासंबंधी स्मरणपत्र.**

महोदय,

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम २००६ व नियम २००८ अंतर्गत गाव ......................, ग्रामपंचायत ..................., ता. ..............., जि. ................. चा वन जमिनींच्या सामुहिक हक्कांसाठीच्या दाव्याचा अर्ज कायदेशीर प्रक्रिया रीतसर पुर्ण करुन आपल्याकडे दिनांक ............. रोजी सादर केला आहे. अर्जाच्या पोचपावतीची झेरॉक्सप्रत सोबत जोडली आहे.

सदर सामूहिक दाव्याच्या बाबतीत आपल्या कार्यालयामार्फत कोणती कार्यवाही झाली याची माहिती कृपया पत्राने कळवावी.

आमच्या दावा अर्जावर कृपया लवकरात लवकर प्रक्रिया करुन अंतिम मंजुरीसाठी जिल्हा समितीकडे पाठवावा, ही विनंती.

सहकार्याच्या अपेक्षेत.

**आपले नम्र**

| | |
|---|---|
| सही ..................................... | सही .................................... |
| नाव ..................................... | नाव .................................... |
| (अध्यक्ष, ग्रामसभा) | (सचिव, ग्रामसभा) |

सोबत : पोचपावती झेरॉक्स

| |
|---|
| येथे रु. १० चा कोर्ट फी स्टॅम्प चिकटवावा |

**जोडपत्र – अ**

**(पहा नियम – ३)**

# माहितीचा अधिकार नियम, २००५ अन्वये अर्ज

प्रति,

मा. उपविभागीय अधिकारी,

....................................

जि. ............................

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव : ..............................................................

२) पत्ता : ..............................................................

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल

❖ (एक) माहितीचा विषय : सामुहिक वन हक्क दाव्याच्या कार्यवाही संबंधी माहिती

# (दोन) माहितीशी संबंधीत कालावधी : ..............................................................

$ (तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन : ..................... ग्रामसभेने दि.    /    / रोजी ''अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम २००६ व नियम २००८'' अंतर्गत दाखल केलेल्या सामूहिक वन हक्क दाव्याच्या बाबतीत आपल्या कार्यालयामार्फत झालेल्या कार्यवाही संबंधी नोटशिटवरील नोंदींसह माहिती

(चार) माहिती टपालाद्वारे किंवा कसे (प्रत्यक्ष टपाल खर्च अतिरिक्त शुल्कामध्ये समाविष्ट केला जाईल.) : ..............................................................

(पाच) टपालाद्वारे असेल त्याबाबतीत (सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शिघ्र) : ..............................................................

४) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे काय ? (असल्यास पुराव्याची सत्यप्रत जोडावी) : ..............................................................

ठिकाण :

दिनांक :

**अर्जदाराची स्वाक्षरी**

❖ विषयाचा स्थुल प्रवर्ग दर्शविण्यात यावा (शासकीय जमिनी देणे/सेवा बाबी/परवाने इत्यादी)

# ज्या कालावधी संबंधीत माहिती आवश्यक आहे तो कालावधी दर्शविणे.

$ माहितीचा विशेष तपशिल दर्शविणे आवश्यक आहे.

# परिशिष्ट (I) : व्याख्या

अधिनियमातील प्रकरण एक मधील काही महत्वाच्या व्याख्या : (स्त्रोत TRTI पुस्तीका)

क) ''सामुहिक वन साधने'' : याचा अर्थ गावच्या पारंपारिक किंवा रुढीगत सीमांतर्गत असणारी किंवा फिरस्ता आदिवासी समाजाच्या बाबतीत भूप्रदेशाचा तसेच राखीव वनांचा, संरक्षित वनांचा आणि समाजाला पारंपारिक प्रवेश असणारी अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने यासारख्या सुरक्षित क्षेत्रांचा (मोसमी) वापर असणारी रुढीगत सामायिक वन जमीन, असा आहे.

ग) ''वन निवासी अनुसूचित जमाती'' : याचा अर्थ मुख्यत्वेकरुन वनात राहणारे अनुसूचित जमातीचे सदस्य किंवा समाज, असा आहे आणि त्यामध्ये अनुसूचित जमातीचे फिरस्ता आदिवासी समाज, जे वनांवर किंवा उपजिविकेच्या खऱ्याखुऱ्या गरजांसाठी वनांवर किंवा जनजमिनीवर अवलंबुन असलेला समाज यांचा समावेश होतो.

घ) ''वनभुमी'' : याचा अर्थ, कोणत्याही वन क्षेत्रात येणारी कोणत्याही वर्णनाची जमिन, असा आहे आणि त्यामध्ये, वर्गीकरण न केलेली वने, सीमांकित न केलेली वने, अस्तित्वात असलेली किंवा मानीव वने, संरक्षित वने, राखीव वने, अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्याने यांचा समावेश होतो.

ड) ''वन हक्क'' : याचा अर्थ, कलम ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेले वन हक्क असा आहे.

छ) ''ग्रामसभा'' : याचा अर्थ, गावातील सर्व प्रौढ सदस्यांची मिळून बनलेली ग्रामसभा आणि पंचायत नसलेल्या राज्यांच्या बाबतीत पाडे, टोले व अन्य पारंपारिक ग्राम संस्था आणि महिलांचा पूर्ण व अनिर्बंध सहभाग असलेल्या निर्वाचित ग्राम समित्या असा आहे.

टीप : TRTI वेबसाईटवरील प्रश्नोत्तरे मधील क्र. १३ मध्ये नमुद केले आहे की गट ग्रामपंचायतीमधील प्रत्येक महसुल गावासाठी त्याच गावांच्या लोकांकडून स्वतंत्र वन हक्क समिती स्थापन करण्यात यावी.

तसेच मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि. ६.५.२००८ रोजी झालेल्या राज्यस्तरीय समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तात या विषयावर वरील प्रमाणेच प्रत्येक महसुली गावासाठी स्वतंत्र वन हक्क समिती स्थापन करावी असा निर्णय झाल्याचे प्रसिद्ध केले आहे.

झ) ''गौण वनोत्पादन'' : यामध्ये, बांबु, खुरटी झाडी, खोड, वेत, कोसा, रेशमी किड्यांचे कोश, मध, मेण, लाख, तेंदू, किंवा तेंदू पत्ता, औषधी वनस्पती आणि कंदमुळे, मुळे, लहान खोडे यांच्यासारख्या इमारती लाकूड नसलेल्या सर्व वनोत्पादनांचा समावेश होतो.

ण) ''इतर पारंपारिक वननिवासी'' : याचा अर्थ, १३ डिसेंबर २००५ पूर्वी किमान तीन पिढ्यांपासून मुख्यत्वेकरुन वनात राहणारा आणि उपजिविकेच्या खऱ्याखुऱ्या गरजांसाठी वनांवर किंवा वन जमिनींवर अवलंबुन असणारा कोणताही सदस्य किंवा समाज, असा आहे.

स्पष्टीकरण : ''पिढी'' याचा अर्थ पंचवीस वर्षाचा कालखंड असा आहे.

❖❖❖

# परिशिष्ट (II) : वन हक्क

अधिनियमातील प्रकरण दोन (कलम ३.१ व ३.२) मध्ये या कायद्याद्वारे मिळालेल्या वन हक्कांचे सविस्तर विवेचन आहे.

(३.१) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, सुरक्षित वैयक्तिक किंवा सामुहिक किंवा दोहोंचे धारणाधिकार म्हणून असलेले पुढील हक्क वननिवासी अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी यांचे वनहक्क असतील –

क) वननिवासी अनुसूचित जमाती किंवा इतर पारंपारिक वननिवासी यांच्या सदस्यांने किंवा सदस्यांनी वस्ती करण्यासाठी किंवा स्वत:च्या उपजिविकेकरिता शेती करण्यासाठी वैयक्तिक किंवा सामायिक व्यवसाय म्हणून वनजमिनी धारण करण्याचा व त्यामध्ये राहण्याचा हक्क.

ख) पूर्वीच्या संस्थानांमध्ये वापरले जाणारे आणि कोणत्याही नावाने ओळखण्यात येणारे ''निस्तार'' सारखे हक्क, जमिनदारी किंवा अशा मध्यम अवस्थांमधील पद्धती.

ग) गावच्या सीमांतर्गत किंवा सीमेबाहेर पारंपारिकरीत्या गोळा केल्या जाणारे गौण वनोत्पादन गोळा करणे, त्याचा वापर करणे किंवा त्याची विल्हेवाट लावणे यासाठी स्वामित्व हक्क.

घ) पाण्यामधील मत्स्य व अन्य उत्पादने, चराई करणे (प्रस्थापित वा तात्पुरती अशा दोन्ही स्वरुपाची) पारंपारिक मोसमी साधनसंपत्ती मिळविण्यास भटक्या किंवा फिरस्ता आदिवासी समाजास मुभा असणे यासारखे इतर सामाजिक हक्क असणे किंवा त्यास तो हक्कदार असणे.

ज) सर्व वन ग्रामे, जुनी वसतिस्थाने, भूमापन न केलेली गावे आणि अन्य गावे – मग ती महसुली गावे म्हणुन अभिलिखीत, अधिसूचित केलेली असोत किंवा नसोत यांची वसाहत करण्याचा हक्क.

झ) निरंतर वापर करण्यासाठी पारंपारिकरित्या संरक्षण व संवर्धन करण्यात आलेल्या कोणत्याही सामाजिक वन-स्त्रोतांचे संरक्षण, पुनर्निर्माण, संवर्धन किंवा व्यवस्थापन करण्याचा हक्क.

टीप : यामध्ये सामूहिक वनस्त्रोतांचे संपूर्ण व्यवस्थापन म्हणजेच त्यासंबंधीचे सर्व निर्णय घेण्याचे अधिकार गावाला देण्यात आले आहेत. या हक्कामुळे संसाधनांचे दीर्घकालीन नियोजन करुन त्याद्वारे शाश्वत विकासाचे मार्ग शोधणे सहज शक्य होणार आहे. व्यवस्थापन करण्याची जबाबदारी गावाने स्विकारणे म्हणजेच स्थानिक अनुभवांच्या आधारावर आपल्यासाठीचे नियम आपणच बनविणे व खऱ्या अर्थाने स्वयंशासनाच्या दिशेने वाटचाल करणे आवश्यक आहे.

ट) जैविक विविधतेत प्रवेश मिळविण्याचा हक्क आणि जैविक विविधता व सांस्कृतीक विविधता यांच्याशी संबंधित बौद्धिक मालमत्ता व पारंपारिक ज्ञान मिळविण्याचा सामुहिक हक्क.

(३.२) सामुहिक सुविधांसाठी म्हणजेच वनेतर उपयोगासाठी वन जमिनी खुल्या करण्याची तरतूद या कायद्यात केली आहे. परंतु यासाठी करावयाची प्रक्रिया स्वतंत्रपणे करावयाची असून प्रस्तावाचे विहित नमुने शासनाने उपलब्ध करुन दिले आहेत.

वन (संवर्धन) अधिनियम, १९८० यामध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, सरकार मार्फत व्यवस्थापन करण्यात येणाऱ्या शाळा, दवाखाना किंवा रुग्णालय, रास्त धान्य दुकाने, अंगणवाड्या, विद्युत व दुरसंदेशवाहक तारा अशा सुविधांकरिता वन जमिनी खुल्या करण्याची तरतुद करील आणि यात दर हेक्टरी पंच्याहत्तर वृक्षांपेक्षा अधिक नाहीत इतके वृक्ष पाडता येतील.

(एक) प्रत्येक प्रकरणात केवळ एक हेक्टरपेक्षा कमी वन जमीन खुली करण्यात येईल आणि

(दोन) प्रकल्पाचा प्रस्ताव ग्रामसभेकडून शिफारस करण्याच्या अधीन राहून करण्यात येईल.

❖❖❖

## परिशिष्ट (III)

## वनहक्क निश्चित करण्यासाठी पुरावा (नियम १३)

वनहक्कांना मान्यता देण्यासाठी व ते निहित करण्यासाठी इतर गोष्टींबरोबर पुढील गोष्टी अंतर्भूत असतील.

क) सार्वजनिक दस्तऐवज, राजपत्रे, जनगणना, सर्वेक्षण व समझोता अहवाल, नकाशे, उपग्रहीय चित्रे, कार्य योजना, व्यवस्थापन योजना, सुक्ष्म योजना, वन चौकशी, अहवाल, इतर वन अभिलेख, पट्टा किंवा भाडेपट्टा यापैकी कोणत्याही नावाने ओळखल्या जाणाऱ्या हक्कांचा अभिलेख यासारखे शासकीय अभिलेख, शासनाने कठित केलेल्या समित्या किंवा आयोगांचे अहवाल, शासकीय आदेश, अधिसूचना, परिपत्रके, ठराव.

ख) मतदार ओळखपत्र, शिधावाटप पत्रिका, पासपोर्ट, घरपट्टीच्या पोचपावत्या, अधिवास प्रमाणपत्र यासारखे शासनाने प्राधिकृत केलेले दस्तऐवज.

ग) घर, झोपड्या व जमिनीवर केलेल्या स्थायी सुधारणा, जसे, समतल बांध, रोधी बांध व तत्सम इतर भौतिक गुणविशेष.

घ) न्यायालयीन आदेश व न्यास निर्णय यांचा समावेश असलेले न्यायिकवत व न्यायिक अभिलेख.

ड) कोणत्याही वन हक्कांचा उपभोग दर्शविणाऱ्या आणि रुढीगत कायद्याचे बळ असणाऱ्या रुढींचा व परंपरांचा भारतीय मानववंशशास्त्रीय सर्वेक्षण संस्थेसारख्या नामांकित संस्थेने केलेल्या संशोधनात्मक अभ्यास व लेखांकन.

च) भुतपूर्व प्रंतिक राज्य किंवा अशा इतर मध्यस्थ संस्थांकडून मिळालेला कोणताही अभिलेख यात नकाशे, हक्कनोंदणी, विशेषधिकार, सुट, अनुग्रह यांचा अंतर्भाव असेल.

छ) प्राचीनत्व सिद्ध करणाऱ्या, विहिरी, दफनभूमी, पवित्र स्थळे यासारख्या पारंपारिक रचना.

ज) पूर्वीच्या भूमि अभिलेखात नमुद केलेली व्यक्तींच्या पूर्वजांचा माग काढणारी किंवा पूर्वीच्या काळी त्या गावातील कायदेशीर रहिवासी असल्याची ओळख पटविणारी वंशावळ.

झ) मागणीदाराखेरीज अन्य वडीलधाऱ्या माणसाचे लेखानिविष्ट कथन

❖ **सामूहिक वन हक्कांच्या पुराव्यात इतर गोष्टींबरोबर पुढील बाबींचा अंतर्भाव असेल –**

क) सामूहिक हक्क जसे, निस्तार – मग ते कोणत्याही नावाने संबोधले जात असोत.

ख) पारंपारिक चराई मैदाने, मुळे व कंद, वैरण, वन्य खाद्यफळे व इतर गौण वनोत्पादने, मच्छिमार क्षेत्रे, सिंचन व्यवस्था, मनुष्य किंवा पशुच्या वापरासाठी पाण्याचे स्त्रोत, औषधी वनस्पती गोळा करणाऱ्या वनस्पती व्यवसायींचे भूप्रदेश.

ग) स्थानिक समूहाने बांधलेल्या रचनेचे अवशेष, पवित्र झाडे, देवराई, तळी किंवा नदी क्षेत्र, दफन किंवा दहनभूमी.

ग्रामसभा, उपविभाग स्तरीय समिती आणि जिल्हास्तरीय समिती, वन हक्क निर्धारीत करतांना वर नमूद केलेल्या बाबींपैकी एकाहून अधिक बाबी विचारात घेतील.

❖❖❖

# परिशिष्ट (IV)

## वनहक्क धारकाची कर्तव्ये


कायद्यातील प्रकरण ३ मधील कलम (५) नुसार वनहक्क धारकाने पार पाडावयाची कर्तव्ये सुनिश्चीत करण्यात आली आहेत. परंतु केवळ कर्तव्ये सोपविण्यात आलेली नसुन ती योग्यरित्या बजावण्यासाठीचेही अधिकार ग्रामसभा व गाव पातळीवरील संस्था यांना देऊन पुर्णपणे सक्षम व सशक्त (मुळ इंग्रजी शब्द – Gram Sabha and Village level institutions are empowered to........ ) करण्यात आले आहे. ही कर्तव्ये अशी आहेत :


क) हक्कांच्या क्षेत्रात असलेले वन, तेथील सर्व प्रकारचे वन्य जीवन आणि जैविक विविधता यांचे संरक्षण करणे.

ख) आपल्या क्षेत्राच्या सभोवतीचे निगडित असे संपूर्ण पाणलोट क्षेत्र, त्यातील जलस्त्रोत आणि पर्यावरणाचा समतोल राखणारी इतर संवेदनाक्षम स्थाने ही पुरेशी सुरक्षित राखण्यासाठी दक्ष असणे.

ग) वननिवासी अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी यांचा अधिवास किंवा निवासाचा परिसर यांचे कोणत्याही स्वरुपाच्या विघातक कृतींपासून संरक्षण करणे जेणेकरुन त्यांची विशिष्ट जीवनपद्धती, सांस्कृतीक, नैसर्गिक तसेच पारंपारिक वारसा यांना अशा कोणत्याही अयोग्य कृतीमुळे धक्का न बसता चांगल्याप्रकारे त्यांचे जतन होईल.

घ) वन, वन्य प्राणी व जैविक विविधता यावर प्रतिकुल परिणाम करणारी कोणतीही कृती थांबविणे आणि सामुहिक वन स्त्रोतांचा लाभासाठी वापर करण्यावर नियंत्रण ठेवून नियमन करण्यासाठी ग्रामसभा स्वत:च्या नियमाच्या आधारे निर्णय घेऊन ते योग्य प्रकारे अंमलात येतील यांची सुनिश्चीती करेल. ❖❖❖









# परिशिष्ट (V)

## वन जोपासना

**सामुहिक वनसंपत्तीचे संवर्धन :** ग्रामसभेची जबाबदारी –

जैवविविधतेचे संवर्धन, टिकाऊ पद्धतीने वापर व या वापराचा न्याय्य लाभ सर्वांपर्यंत पोचवण्यासाठी वनाधिकार कायदा हे एक मोठे साधन आणि त्याबरोबरच युगप्रवर्तनाची संधी आहे. या कायद्याच्या प्रस्तावने प्रमाणे, आदिवासी व इतर पारंपारिक वननिवासियांच्या हक्कांत जैवविविधतेचे संवर्धन, शाश्वत उपयोग व अरण्यांच्या परिसरांचे संतुलन याबाबतचे अधिकार व जबाबदाऱ्यांचा अंतर्भाव आहे, यातून अरण्यसंपत्तीचे संवर्धन अधिक बळकट व्हावे व त्याबरोबरच वननिवासीची उपजिविका आणि सुरक्षित पोषण यांचीही निश्चिती व्हावी अशी अपेक्षा आहे. हे प्रत्यक्षात उतरायचे असेल तर देशभर वननिवासी गावसमाजांनी सामूहीक वनसंपत्तीची सुव्यवस्थीत जोपासना केली पाहिजे. ह्यासाठी त्यांच्यात एकजुट निर्माण झाली पाहिजे. त्यांनी सामूहिक वनसंपत्तीच्या व्यवस्थापनेचे चांगले नियोजन केले पाहिजे व मग ते शहाणपणे व संयमाने अंमलात आणले पाहिजे. ह्यात एकाबाजुने अनेक अडचणी असल्या तरी दुसऱ्या बाजूने ह्याला अनुकूल वातावरण निर्माण होत आहे. ह्या अनुकूलतेमागे अनेक घटक आहेत.

१. वनाधिकार कायद्यातुन आता स्थानिक जनतेला वनसंपत्तीवर व्यापक हक्क मिळाले आहेत. ह्या हक्कांबरोबरच ह्या संपत्तीचा शहाणपणाने, टिकाऊ पद्धतीने वापर करण्याची जबाबदारीही आहे. यासाठी या संपत्तीचा व्यवस्थित आढावा घेऊन, तिच्या उपयोगाचे नियोजन व या नियोजनाची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. हे काम कुठल्याही केंद्रीय यंत्रणेकडुन होणे शक्य नाही आणि योग्यही नाही. ते स्थळ–काल–वैशिष्ट्यांना लक्षात घेऊन परिस्थिती अनुरुप बदल करत, लवचिक पद्धतीने करण्याची जरुरी आहे. तेव्हा हे काम निसर्गाशी जवळीक असणाऱ्या लोकांच्या सहभागाने, म्हणजे ग्रामसभेच्या मार्फत सातत्याने व्हायला हवे. ह्या दृष्टीने ग्रामसभा तिच्या सदस्यांमधुन वन्यजीवन, वन व जैविक विविधता यांचे संरक्षण करण्यासाठी एक समिती गठित करीत. सर्वात उत्तम म्हणजे पूर्ण ग्रामसभाच या समितीचे काम करु शकेल. या कामाकडे जास्त लक्ष पुरवण्यासाठी एक कार्यकारिणी नियुक्त करता येईल व त्यास एक पुरक अभ्यास मंडळ मदत करु शकेल.

२. जैव विविधता कायद्यानुसार ग्रामपंचायत पातळीवर जैवविविधतेचे व तत्संबंधित ज्ञानाचे माहिती संकलन व व्यवस्थापन करण्यासाठी स्थानिक जैवविविधता व्यवस्थापन समितींच्या रुपात एक अधिकृत यंत्रणा अस्तित्वात येत आहे. या यंत्रणेचा दुवा वनाधिकार कायद्यातुन जी व्यवस्था उभी रहात आहे तिच्याशी जोडून दिल्यास एक भरीव, एकसंध काम शक्य होईल.

३. राष्ट्रीय रोजगार हमी कार्यक्रमातून निसर्गसंपत्तीचे संरक्षण, संगोपन, पुनरुज्जीवन करण्याची चांगली संधी आहे. यासाठी कामांची आखणी करण्याची संपूर्ण जबाबदारी ग्रामसभेवर सोपवण्यात आली आहे. अशा कामांची एक व्यवस्थित योजना राबविणे हे ग्रामसभेचे कर्तव्य आहे. ह्या योजनांची वनसंपत्तीच्या व्यवस्थापनांच्या नियोजनाशी नेटकी सांगड लावता येईल.

४. पिकांचे संरक्षित वाण आणि शेतकऱ्यांचे अधिकार कायद्यापासून सर्व पारंपारिक वाणांची नोंदणी होईल व ती वाणे टिकविणाऱ्या शेतकऱ्यांना खास अनुदान मिळु शकेल. अशा पारंपारिक वाणांची व शेतकऱ्यांनी स्वतः निर्माण केलेल्या वाणांची नोंदणी व ती जतन करण्याची योजना हा ग्रामपातळीवरील निसर्गसंपत्तीविषयक नियोजनाचा एक भाग राहील. हा कार्यक्रम सामूहिक वनसंपत्तीच्या जोपासनेशी जोडुन दिल्यास वृक्षावरणाखालील तसेच लागवडीखालील वनजमिनीवर वैविध्यपुर्ण जीवसृष्टी उभी करता येईल.

**(बहरु दे हक्काची वनराजी – लेखक प्रा. माधव गाडगीळ या पुस्तकातून साभार)** ❖❖❖

## परिशिष्ट (VII) : सामुहिक वनहक्क अभिलेख – ग्रामसभा मेंढा (लेखा)

भारत सरकार
जमाती कार्य मंत्रालय
अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे)
अधिनियम २००६, नियम, २००८
सामुहिक वन हक्कांचे हक्क
जोडपत्र - तीन
(पहा नियम- ८ (ज))

जिल्हा प्रकरण क्रमांक. १२०७ /०९

| | | |
|---|---|---|
| १. सामुहिक वन हक्कधारकाचे नांव/ धारकांची नांवे | :- | श्री. बिरजू जोगी तोफा व इतर गावकरी मेंढा (लेखा) |
| २. गांव/ ग्रामसभा | :- | ग्रामसभा मेंढा (लेखा) |
| ३. ग्रामपंचायत | :- | लेखा |
| ४. तहसिल/ तालुका | :- | धानोरा |
| ५. जिल्हा | :- | गडचिरोली |
| ६. अनुसूचित जमाती आहे की,/ इतर पारंपारिक वन निवासी आहे | :- | अनुसूचित जमाती |
| ७. सामुहिक हक्कांचे स्वरुप | :- | गांव समाजाचे दाव्यातील बाब क्र.१ ,२,३,४,५, ६, प्रमाणे निस्तार हक्क व इतर वरील नियमाप्रमाणे लागू असलेले हक्क) |
| ८.शर्ती काही असल्यास | :- | शासनाचे नियमाप्रमाणे |
| ९. रुढी प्राप्त सीमांसह/किंवा खसरा/खंड क्र. यासह ठळक सीमांचिन्हे दर्शवून केलेले सीमांचे वर्णन. | :- | आराजी. १८०९.६१ हेक्टर कंपा.नं. सर्वे नं. ४६८,४६९, ४७०,४७१,५११ |

### सामुहिक वन हक्क धारकांचे नांव (धारकांची नांवे)

१. मौजा. ( लेखा ) मेंढा येथील समस्त नागरीक .

२. निस्तार पत्रकातील तरतुदी नुसार नसेच गौण वनोस्पती.

३. कायदेशिर हक्कांना मान्यता देण्यात येते.

४. दाव्यातील १,२,३,४,५, ६, प्रमाणे निस्तार हक्क व इतर सर्व हक्क मान्य.

आम्ही खालील सही करणारे महाराष्ट्र शासन यांच्यासाठी व त्यांच्या वतीने, सामूहिक वनहक्कांच्या उपरोल्लिखित धारकांना शिर्षकात उल्लेखिल्याप्रमाणे वनहक्क कायम करण्यासाठी आमच्या स्वाक्षऱ्या करीत आहोत. निस्तार पत्रकात नमूद असलेले ख.नं. पूर्नर मोजणी नंतर बदलले असल्याने नवीन सर्व्हे नंबर नुसार ते लागु होतील. ज्या जमिनी पूर्वी वाटप झाल्या व आता वैयक्तिक वन हक्क देण्यात येत आहे त्या वगळून उर्वरीत जमिनीवर सामुहिक हक्क लागु राहतील.

विभागीय वन अधिकारी/उप वन संरक्षक
गडचिरोली

अप्पर आयुक्त आदिवासी विकास विभाग,
नागपूर

28 AUG 2009

जिल्हाधिकारी/ उपायुक्त

# जनजागृतीकरिता प्रसिध्द केलेली कायद्याची माहिती पत्रके, वृत्तपत्रातील जाहिरात

महाराष्ट्र शासन

**जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालय**

**गडचिरोली जिल्ह्यातील सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की,**

**अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता)**

**अधिनियम- २००६ आणि नियम - २००८**

या केंद्रिय कायद्याची अंमलबजावणी गडचिरोली जिल्ह्यात सुरु असून त्याव्दारे

- शासनाने गावसमाजाला वन जमिनीवर निस्तार, गौणवनोत्पादने, जलसंपत्ती चराई व वन व्यवस्थापनाचे सामुहिक अधिकार देवू केले आहेत.
- १३ डिसेंबर २००५ पूर्वी वन भूमि संपादित केलेल्यांना वैयक्तिक दावे म्हणून आर्जातोभत दोन साक्ष पुरावे असल्यास चार हेक्टर पर्यंत शेती करण्याचा व निवासाचा हक्क सुध्दा मिळू शकतो.
- सामुहिक व व्यक्तिगत वन हक्क दाव्यांसाठी वेगवेगळ्या नमुन्यात दावा सादर करणे आवश्यक आहे. सामुहिक दाव्यासाठी एक हेक्टरच्या मर्यादित असून ऐका हेक्टरातील ७५ पेक्षा जास्तची वृक्षतोड करता येणार नाही या मर्यादेत राहील.

**सामुहिक वन हक्क दावा करतांना हे लक्षात घ्यावे**

- जिथे गावाचे निस्तार पत्रक असेल तिथे त्यांत नमूद क्षेत्राकरिता दावा करून पुरावा म्हणून निस्तार पत्रक व नकाशाचा उल्लेख करावा.
- जिथे गावाचे निस्तार पत्रक नसेल तिथे परंपरागत निस्तार क्षेत्राचे वर्णन करून अंदाजे काढलेला नकाशा जोडावा. ● गौणवनोत्पादनाचा दावा कायद्यातील व्याख्येप्रमाणे ईमारती लाकूड सोडून बाकी सर्व वनोत्पादने अशीच् शब्दरचना करावी. ● पारंपारिक हक्क असलेल्या वनांचे संरक्षण, संवर्धन व व्यवस्थापन करण्याचा वन हक्क दावाही गावसमाज करू शकतो. ● सामुहिक हक्क असलेल्या अशा वनक्षेत्रातील वन, वन्यजीवन व जैवविविधतेचे संरक्षण, संवर्धन व व्यवस्थापन करण्याचे कर्तव्य करण्याकरिता कायद्याने गावसमाजाला सशक्त केले आहे.● असे वन, भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम २८ प्रमाणे " ग्रामवन" घोषीत करून गावसमाजाला व्यवस्थापनासाठी हस्तांतरीत करता येते. याच गावसमाजाची जैव विविधता अधिनियम २००२ चे कलम ४१ अनुसार जैवविविधता व्यवस्था समिती (जै. व्य. स.) गठीत करून अधिलाभ घेता येईल.
- गावसमाज पातळीवर वनहक्कासोबत " ग्रामवन" व " जै. व्य. स." ची सांगड घालून संपूर्ण रोजगाराचे नियोजन केल्यास रोजगार हमी साठी उपलब्ध असलेले पैसे वापरून गावाचा शाश्वत विकास साधता येईल.● त्याकरिता माध्यापासून सुरु होणारा पाणलोटक्षेत्र विकासाचा" माती अडवा- पाणी जिरवा" हा माती, पाणी व वन विकासाचा कार्यक्रम घेता येईल.

वन हक्क दावा करण्याकरीता आवश्यकमाहिती व निस्तारपत्रक आणि नकाशांसह कागदपत्रांचा संच जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे सर्व राजस्व गावांच्या वन हक्क समितीकडे पाठविण्यात आला आहे. मिळाला नसल्यास जवळच्या तहसिलदारांना त्वरीत लेखी कळवावे.

**अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी**

**(वन हक्क मान्य करणे) अधिनियम, २००६ व नियम २००८ (वन हक्क कायदा)**

[illegible]

## अनुसुचित जनजाती एवम परंपरागत वन निवासी कानून २००६ तथा नियम २००८ व्दारा प्राप्त वनअधिकार

सदीयों से जंगलोंमें रहनेवाले अनुसुचित जनजाती एवं अन्य वन निवासीयों को केंद्रीय सरकार के वन अधिकार अधिनियम व्दारा पे पिढी-दर पिढी उपयोग कर रहे वनजमीन का हक मिलने वाला है। यह अधिकार वास्तव में उपयोग में लाए जाने वाली जमीन के क्षेत्र इतनाही होगा लेकिन वह क्षेत्र किसी भी हालत में ४ हेक्टर से ज्यादा नहीं होगा।

इस कानून के प्रावधान मुताब गौण वनोपज का इस्तेमाल करना तथा उसकी बिक्री करना अनुसुचित जनजाती एवं अन्य परंपरागत वननिवासियों को आसान होने वाला है। इसके अलावा वनजमीन के पट्टे अनुसुचित जनजाती एवं अन्य परंपरागत वननिवासीयोंको मिलने के बाद उन्हें सरकार की विविध योजनाओंका लाभ मिलने वाला है। इस अधिनियम में वनजमीन पर आदिवासीयोंका हक मंजूर करना तथा उनका परंपरागत हक अबाधित रखनेके साथही वन्य जीव वनसृष्टी और जैवविविधता की सुरक्षा करना यह बाते भी समाविष्ट है। इस कानून से अनु.जनजाती व अन्य वननिवासी जनता को उनकी मालकियत की हक की जमीन देने का उद्देश्य सफल होकर आदिवासीयों के जीवन में अमुलाग्र परिवर्तन आकर क्रांती पैदा होगी।

**इस कानून के लाभार्थी कौन ?**

१) जंगल में रहनेवाले अनु.जनजाती के ऐसे लोग अथवा गुट जो जंगल में निवास करते है और वन तथा वनजमीन पर अपने उदर निर्वाह की आवश्यकताओं के लिए निर्भर है। इसमें जानवर चरानेवाले समाजका भी समावेश है।

२) अन्य परंपरागत वन निवासी मतलब ऐसे लोग तथा गुट जो १३ डिसंबर २००५ के पूर्व कमसे कम तीन पिढियां प्राथमिक तौर से जंगल में रह रहे है अथवा ७५ सालोंसे जंगल में रह रहे है एवं जो वन अथवा वनजमीन पर अपने वास्तविक निर्वाह की आवश्यकताओं के लिए निर्भर है। यह आपको पता है ? वनजमीन मतलब वनक्षेत्र की कोईभी प्रकारकी जमीन एवम अवर्गीकृत जंगल, प्रस्ताव अधिनियम में है ऐसा अथवा अनुसूचित वन, संरक्षित वन, आरक्षित वन, राष्ट्रीय उद्यान तथा अभयारण्य. **गौण वनोपज** मतलब इमारती लकडी के अलावा सभी वनस्पतीजन्य वनोपज जिसमें बांबू, झाडझूड, खोड, बेत, तसर, मध, मेण, लाख, औषधी वनस्पती, मूळी, कंद जैसे अन्य उत्पादन का समावेश है। **सामुदायिक वन संसाधन** मतलब गांव के परंपरागत सामाईक जंगल अथवा जानवर चराने वाले समाज के बारेमें उस हंगामी चराई के लिए उपयोग में लाए जानेवाला भूप्रदेश, जिसमें परंपरागत अधिकारवाले आरक्षित वन और अभयारण्य एवम उद्यानों जैसे संरक्षित क्षेत्र शामील है।

**इस कानून व्दारा मिलनेवाले लाभ**

१) जंगल में रहनेवाले अनुसुचित जनजाती अथवा अन्य परंपरागत वन निवासीयों को उनके व्यक्तिगत अथवा सामुदायिक उपयोग की वनजमीन धारण करने का और वहांपर रहने का मालकियत हक मिलेगा. २) गांव की हद में अथवा बाहर से परंपरागत तौरपर जिनका उपयोग किया जा रहा हो ऐसे गौण वनोपज पर स्वामित्व प्राप्त करने का, इस्तेमाल करने का और उसका बिक्री करने का अधिकार ३) तालाब और अन्य जलसाठों में से जीव निकालने का एवं इस्तेमाल करने का अधिकार ४) वनजमीन के संबंध में अर्जदार व्यक्ति के हक का निर्णय होता नहीं तब तक उन्हें वनजमीन पर से बेदखल नहीं किया जा सकता। **इस कानून का अमल कैसा होगा ?** इस कानून के अमल के लिए ग्राम पंचायत ग्रामसभा बुलाएगी और उसमें से १५ सदस्योंकी वनअधिकार समिती नियुक्त होगी. इस समिती में अनुसूचित जनजाती के ५, महिलाओं के ५, अन्य पांच ऐसे सदस्य नियुक्त किए जाएंगे जिनमें से एक अध्यक्ष और एक सचिव का चयन किया जाएगा।

## अनुसुचित जमाती व अन्य पेळीन पेळी गेळात मनवालीरा कायदा २००६ व नियम २००८

**गेळाता अधिकार**

पेळीन पेळी गेळात मनवालोर अनुसुचित जमाती व इतर गेळात मनवालोर लोकुनासाठी केंद्र सरकारचा गेळात कायदा अनुसार हक्क-अधिकार पुरावा मेता. इद अधिकार प्रत्यक्ष वहिवाट कियाना क्षेत्रापुरता मंदार. तरीपणी कोणाई परिस्थितीत इद क्षेत्र ४ हेक्टरता पेक्षा जास्त पुरवार हिले.

इद कायद्यानुसार गौण गेळाता उत्पाद वापर कियाना आणि वापरा इद मंळो अनुसुचित जमाती व अन्य पेळीन पेळी गेळात मनवालोर सरस आसान मेता. असे इद गेळाता पट्टा अनुसुचित जमाती व पेळीन पेळी मनवालोरकून पुरान आणि सरकारना विविध फायदा पुरपुर.

इद अधिनियम ते वनवासींना अधिकारी पून हक्क मान्य कियाना व ओराहून पेळीनपेळी गेळाना हक्क मंजूर किसी गेळाना जीवा आणि गेळा समृद्ध कियानासाठी आणि संरक्षण कियानासाठी इद कायद्याला उपयोग आसार. इद कायदाने अनुसुचित जमाती आणि पेळीनपेळी मनवालोर लोकुनकून जागाना मालकी हक्क सिसी ओर जिवनात बदल आसी मोठी क्रांती वायार.

**इद कायदातीर वाटेकरी कोण ?**

१) गेळात मनवालोर अनुसुचित जमातीतोर लोकुन किंवा पेळीनपेळी गेळात मंतोर ओराताळी अनुसन्चा निर्वाहित किंवा आपुन कोंडा मेहीतोर लोक समावेश आसार. २) पेळीन पेळी गेळात मनवा लोर किंवा ओरा गट ३१ डिसेंबर २००५ ता पयले गेळात मंतोर ओराताळी किंवा ७५ वरश पयले ओराताळी अनुसन्चा निर्वाहित लागू आसार.

**इद जिवक लाहीत मंता मीर ?**

गेळा- जमीन मंते कोणाई प्रकारता जागा आणि अवर्गीकृत गेळा किंवा सुचीत गेळा, संरक्षित गेळा, आरक्षित गेळा, अभयारण्य इतेल समावेश आंता.

गौण गेळाता उत्पन्न मंते बेहूर, खुराटी, डाळी, खोड, खोसा, रेसमी, सिवाला कोस, आन्याळमीई वड़ी, लाहून तुमीर, मंडी तुमीर, असे गेळाता ओताणी नाटी वाचा मंडी इतला मर्द, इतेना लेहका समावेश आंता. सामुदायिक गेळा संसाधन मंते नाटेना गेळा जागा किंवा कोणाता गेळातोर जागा, पेळीनपेळी अधिकार मने संरक्षित गेळा आणि अभयारण्य व उद्याने इतेना समावेश मेता.


**इद कायदाता फायदा :**

१) गेळात मनवालोर अनुसुचित जमाती तोर लोकुन किंवा पेळीनपेळी गेळात मनवा लोकुनकून किंवा लोकुनता गट तून गेळा मव्हानासाठी किंवा वापर कियानासाठी कब्जा पुरार.

२) नाटेना हद्दीत किंवा नाडेर नाटेना हद्दीत गौण गेळाना उत्पन्न जमा कियाना साठी, वापरे मालकासाठी आणि मनवासाठी अधिकार पुरार.

३) बोडी आणि जलसाठ इताळा जीवा पिडे कियाना साठी आणि वापरे मालना साठी अधिकार.

४) गेळाना जागा बाबातीत ओमतीर कोणताई निर्णय आयो, अगली एलवाडू अग मनेतीकून बेदखल किया वायो.





मा. पालकमंत्री श्री. आर. आर. पाटील कुरखेडा तालुक्यात
सामुहिक वनहक्क अभिलेख प्रदान करतांना



मा. जिल्हाधिकारी श्री. अभिषेक कृष्णा
मुलचेरा तालुक्यात अभिलेख प्रदान करतांना



धानोरा येथील कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना
श्री देवाजी तोफा



प्रशिक्षणात उपस्थित अधिकारी/कर्मचारी



सामुहिक वनहक्क कार्यशाळा गडचिरोली येथे
मार्गदर्शन करतांना उपविभागीय अधिकारी
श्रीमती किरण कुलकर्णी



# ले खा में ढा

# बांबू विक्रीतून ७४ लाख रुपये मिळविणारे देशातले पहिले गाव

**चंद्रपूर, १४ ऑक्टोबर/खास प्रतिनिधी**

सामूहिक मालकी मिळालेल्या जंगलातील बांबू विक्रीचा सुमारे एक कोटीचा करार करून चर्चेत आलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील लेखामेंढा या गावाला हे कंत्राट मिळवणाऱ्या भोपाळच्या व्यापाऱ्याने आज २० टक्के सुरक्षा ठेव व खरेदी किंमतीच्या ५० टक्के रक्कम म्हणून ६२ लाख ७७ हजार रुपयाचा धनादेश प्रदान केला. बांबू विक्रीच्या करारापोटी याआधी या व्यापाऱ्याने ११ लाख ७५ हजार रुपये अनामत रक्कम म्हणून जमा केले होते आणि आज दिलेल्या ६२ लाख ७७ हजार रुपयाच्या धनादेशामुळे ग्रामसभेकडे आता ७४ लाख ५२ हजार रुपये जमा झाले आहेत. गावातील मुख्य मैदानावर झालेल्या या कार्यक्रमाला सर्व गावकरी हजर होते. बांबू विक्रीतून एवढी मोठी रक्कम मिळवणारे देशातले हे पहिलेच गाव ठरले आहे.

२००६ मध्ये केंद्र शासनाने लागू केलेल्या वनहक्क कायद्याचा वापर करून लेखामेंढा या गावाने गेल्या एप्रिलमध्ये गावाच्या सभोवताल असलेल्या १८०० हेक्टर जंगलावर सामूहीक मालकी हक्क मिळवला होता. वनखात्याने सुरुवातीला हा हक्क देण्यास नकार दिला. नंतर या जंगलातील गौण उपज तोडण्यास नकार दिला. अखेर तेव्हाचे केंद्रीय पर्यावरण राज्यमंत्री जयराम रमेश यांच्या हस्तक्षेपानंतर या गावाला बांबू तोडण्याचे तसेच, त्याची विक्री करण्याचे अधिकार मिळाले होते.

गेल्या हंगामात या गावाने बांबू विक्रीतून २० लाख रुपयाचा नफा मिळवला होता. यंदा या गावाने रितसर निविदा प्रकाशित करून बांबू खरेदीसाठी व्यापाऱ्यांना निमंत्रित केले होते. एक महिन्यापूर्वी भोपाळचे बांबू व्यापारी आर.के. आनंद यांची निविदा लेखामेंढाच्या ग्रामसभेने मंजूर केली होती. यंदाच्या हंगामात आर.के. आनंद या गावाची मालकी असलेल्या जंगलातून सुमारे एक कोटी रुपयाचा बांबू विकत घेणार आहेत. बांबू विक्रीच्या करारापोटी याआधी या व्यापाऱ्याने ११ लाख ७५ हजार रुपये अनामत रक्कम म्हणून जमा केले होते आणि आज दिलेल्या ६२ लाख ७७ हजार रुपयाच्या धनादेशामुळे ग्रामसभेकडे आता ७४ लाख ५२ हजार रुपये जमा झाले आहेत. हा करारनामा आजपासून सुरू झाला असून ३१ मार्च २०१२ पर्यंत या करारनाम्याची मुदत आहे. ग्रामसभेतर्फे सामूहीक वनहक्क समितीचे अध्यक्ष नरेश कुमेटी व चरण तोफा यांनी करारनाम्यावर स्वाक्षरी केली. साक्षीदार म्हणून सामाजिक कार्यकर्ते मोहन हिराबाई हिरालाल व सुबोध कुळकर्णी यांनी स्वाक्षरी केली. वनखात्यातर्फे यावेळी वनरक्षक भारती भदें व गडचिरोलीचे प्रा. कुंदन दुपारे, प्रा. वीणा जम्बेवार हजर होते.



# लेखामेंढा व मारदाला मिळाली जंगलाची मालकी

# अखेर ६२ वर्षांनी लेखामेंढावासीयांचा जंगलावरील सामूदायिक दावा मान्य

◇ गडचिरोली ठरला देशातील पहिला जिल्हा ◇ ४८० गावकऱ्यांच्या जिद्दीचा विजय

विशेष







sai graphics, gad. 9422360999 / 233111